cmyk

## संपादकीय

### मतदानाचा टक्का वाढावा...

महाराष्ट्रातील मतदानाची घसरलेली टक्केवारी चिंतेचा विषय ठरत आहे. नागरिक मतदान करण्यासाठी घराबाहेर का पडले नाहीत, याचा विचार निवडणूक आयोग आणि सर्वच राजकीय पक्षांनी करणे गरजेचे आहे. आगोदरच्या तीन टप्प्यात झालेले मतदान टक्का घसरल्याचेच सांगते. आज १३ मे रोजी चौथ्या टप्प्याचे मतदान पार पडत आहे. या वेळेस तरी मतदानाचा टक्का वाढावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.


दैनिक

# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-३२ | सोमवार दि.१३ मे २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये


### शाळांनतर रुग्णालयांना बॉम्बने उडवून देण्याची धमकी

नवी दिल्लीः दिल्लीतील शाळांना बॉम्बने उडवण्याची धमकी दिल्यानंतर आता दोन रुग्णालयांना बॉम्बने उडविण्याच्या धमक्या मिळाल्या आहेत. धमकी देणाऱ्याने धमकीचा ईमेल पाठवला आहे. प्राथमिक माहितीनुसार, धमकीचा ई मेल संजय गांधी हॉस्पिटल आणि बुरारी हॉस्पिटलला मिळाला आहे. धमकीचा ई मेल मिळाल्यानंतर रुग्णालयांच्या प्रशासनाने तत्काळ तक्रार केली. पोलीस, अग्निशमन विभाग आणि सर्व नागरी यंत्रणांव्यतिरिक्त बॉम्ब आणि श्वानपथक घटनास्थळी धाव घेतली आहे. रुग्णालयात शोधमोहीम सुरू आहे.

## कार्यकर्त्यांना अटक करण्याचे थांबवा

### मेहबूबा मुफ्ती यांचे निवडणूक आयोगाला पत्र




श्रीनगर । वृतसंस्था

**पीडीपीच्या अध्यक्षा मेहबुबा मुफ्ती यांनी रविवारी श्रीनगर लोकसभा मतदारसंघातील निवडणुकीच्या एक दिवस अगोदर, त्यांच्या पक्षाच्या कार्यकर्त्यांचा कथित छळ आणि अटक थांबवण्यासाठी निवडणूक आयोगाकडे हस्तक्षेप करण्याची मागणी केली.**


जम्मू आणि काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री आणि पीपल्स डेमोक्रॅटिक पार्टी (पीडीपी) च्या अध्यक्षा मेहबूबा मुफ्ती यांनी १२ मे रोजी ''१९८७ च्या शैलीतील हेराफेरी आणि ◄◄ पान २ वर

# शेतकऱ्यांच्या विकासासाठी भरडधान्य पीकवा

## मराठवाड्यातील भरडधान्य पिक परिषदेत तज्ज्ञांचा सूर

नांदेड । प्रतिनिधी

**मराठवाड्यासाठी भरडधान्य पिकांचा विकास आराखडा तयार करणे गरजेचे आहे. यासह उत्पादन वाढ, प्रक्रिया उद्योजकाला चालना, मूल्यवर्धित पदार्थांची निर्मिती व विक्री, भरडधान्याचा आहारातील वापर वाढवण्यासोबतच भरडधान्य पिकांचा जनावरांचा चारा व इंधन म्हणून वापर वाढावा, यासाठी या पिकांच्या लागवडीस प्रोत्साहन द्यावे ज्यातून सर्वांगिण विकास साधणे सोपे जाईल असे या क्षेत्रातील तज्ज्ञांनी येथे म्हटले,**



मराठवाड्यातील भरडधान्य पिकांचे विशेषतः ज्वारी व बाजरी पिकाचे पुनरुज्जीवन करण्याच्या उद्देशाने कापूस संशोधन केंद्र नांदेड येथे एक दिवसीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या परिषदेत अनेक तज्ज्ञांनी भरड धान्य पिकाच्या पुनरुज्जीवनावर आपली मते मांडली. तसेच या तज्ज्ञांनी, भरडधान्य पीक वाढेल, विकासही होईल, असा आशावाद व्यक्त केला. यावेळी या परिषदेच्या ◄◄ पान २ वर

### ज्वारी, बाजरी पिकांबाबत चर्चासत्र

*मराठवाड्यातील ज्वारी व बाजरी हे प्रमुख भरडधान्य पीक असून मागील काही वर्षापासून ज्वारी व बाजरी पिकात घट होत असल्याचे समोर आले आहे. पेरणी क्षेत्र दिवसेंदिवस कमी होत असून आहारामधील वापर देखील अल्प प्रमाणावर आला आहे. यामुळे मानवी आरोग्याच्या विविध समस्या भेडसावत आहेत. या दोन दिवसीय परिषदेमध्ये ज्वारी व बाजरी पिकाच्या पुनर्जीवनासाठी, सुधारित वाणाचा वापर, ज्वारी काढणी व प्रक्रियेमध्ये यांत्रिकीकारणाचा वापर, भरडधान्यासाठी राज्य शासनाच्या विविध योजना, शेतकऱ्याच्या दृष्टीकोनातून भरडधान्य पिकातील विविध समस्या, आंतरपिक व मिश्रपिक पद्धतीचा वापर, प्रक्रिया उद्योग चालना व आहारातील समावेश वाढ अशा विविध विषयावर चर्चासत्र घेण्यात आले.*

# मुंडे- महाजनांनंतर बीडला पुन्हा राष्ट्रीय नेतृत्वाची संधी..!

## पंकजाताई मुंडे यांच्यासाठी शहरांसह वाड्या-वस्त्यांवरील मतदार सरसावले

बीड । प्रतिनिधी

**राज्याच्याच नव्हे तर देशाच्या राजकारणात दिवंगत गोपीनाथ मुंडे यांनी आपला वेगळा ठसा उमटवला होता. राज्यात पाच वर्ष मंत्री पदाची संधी मिळाल्यावर त्यांचे नेतृत्व देश पातळीवर पोहचले. पण दुसऱ्या खेपेला निवडून गेल्यानंतर ग्रामविकास मंत्री होताच अपघाती निधन झाले आणि दहा वर्षापासून बीडसह मराठवाडा राष्ट्रीय नेतृत्वासाठी चाचपडत आहे. पंकजा मुंडे यांच्या निमित्ताने पून्हा एकदा राष्ट्रीय नेतृत्वाची संधी जिल्ह्याच्या दारावर चालून आली आहे. भाजपातील पहिली पिढी वृध्दापकाळाकडे गेल्याने तरूण नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली आहे. पंकजा यांची राजकीय क्षमता, लोकसमर्थन लक्षात घेता पुढे अनेक वर्ष त्या नेतृत्व करू शकतात. त्यामुळे राष्ट्रीय नेतृत्व बीड जिल्ह्याकडे येण्याची संधी या लोकसभा निवडणुकीच्या माध्यमातून मिळणार आहे. ही बाब खऱ्या अर्थाने जिल्ह्यातील मतदारांनी लक्षात घेतली पाहिजे.**

राजकारण आणि बीड जिल्ह्याचे नाते तसे जवळचेच राहीले आहे.



### पंकजाताईंना डावलून ज्यांना संधी दिली ते कुठे गेले?

पक्षांतर्गत स्पर्धेतून पाच वर्षे पंकजा मुंडेंना राजकीय विजनवासात ठेवून पक्षाच्या पदरात काय पडले? प्रत्येकवेळी डावलून मुंडे समर्थकांना चुचकारण्यासाठी डॉ.भागवत कराड, रमेश कराड, उमा कापरे या दुसऱ्या फळीतील नेत्यांना मोठ्या पदांची संधी दिली. त्यांचा या निवडणूकीत किती उमेदवारांना फायदा होणार आहे? याचा विचार पक्षनेतृत्वाला करावा लागेल, असे म्हटले जात आहे. तर दुसरीकडे पक्षान डावलून सुध्दा पंकजा मुंडे यांनी स्वत: चा प्रचार करीत करीत राज्यातील बऱ्याच उमेदवारांसाठी सभा घेतल्या.

सुरूवातीला डाव्या विचारसरणीचे बापुसाहेब काळदाते यांनी आपल्या अभ्यासु वकृत्वाने दिल्लीत वजन निर्माण केले होते. ◄◄ पान २ वर

## मातृ दिनालाच चिमुकली झाली पोरकी...

### आईचा खून करून वडिलांनी केली आत्महत्या

बीड । प्रतिनिधी

मातृ दिन जगभर साजरा केला जात असताना, बीड शहरात एक पाच वर्षीय चिमुकली आई - वडिलांविना पोरकी झाली. वडिलांनी आईचा खून करीत स्वतः गळफास घेऊन आत्महत्या केली. ही हृदयद्रावक घटना शहरातील वृंदावन कॉलनीत रविवारी पहाटेच्या सुमारास उघडकीस आली. कौटुंबिक वादातून हा प्रकार घडल्याचा अंदाज पोलिसांनी व्यक्त केला आहे.

राधा वायभट (२६) व भागवत वायभट (३५) रा.लिंबागणेश ता.बीड हे पती - पत्नी आणि त्यांची पाच वर्षाची मुलगी बीड शहरातील वृंदावन कॉलनीत भाड्याने राहत होते. भागवत हा रिक्षा चालवत असायचा. शनिवारी रात्री तो घरी आला. यावेळी पत्नी आणि त्यांच्यात किरकोळ कारणावरून वाद झाले. यामध्ये त्याने पत्नीला मारहाणही केली. त्यानंतर मध्यरात्रीच डोक्या खाली ◄◄ पान २ वर

# तुतारीसाठी मराठा समाज अग्रेसर

## बजरंग सोनवणे यांना वाढता पाठिंबा



बीड । प्रतिनिधी

लोकसभेची निवडणूक आता अंतिम टप्प्यावर आली असून दिनांक १३ मे रोजी मतदान आहे. आपल्या लाडक्या नेत्याला मतदान करण्यासाठी आणि तुतारी बळकट करण्यासाठी मराठा समाज अग्रेसर झाला आहे. सर्व स्तरातून बजरंग सोनवणे यांना पाठिंबा मिळत आहे. एक मत आपल्या पसंतीच्या उमेदवाराला देण्यासाठी सोमवारी सकाळपासूनच मतदार घराबाहेर पडणार आहेत.

बीड लोकसभेची निवडणूक यावेळी अत्यंत चुरशीची बनली आहे. भाजपच्या पंकजा मुंडे आणि महाविकास आघाडीचे बजरंग सोनवणे आणि वंचित आघाडीचे अशोक हिंगे यांच्यामध्ये तिरंगी लढत होणार आहेत. यांच्यासाठी बीड जिल्ह्यातील मराठा समाज आणि मुस्लिम समाज एकवटला असून आपल्या पसंतीच्या उमेदवाराला मतदान ◄◄ पान २ वर

### अशोक हिंगे यांच्यामुळे चुरस वाढली



वंचित आघाडीचे उमेदवार अशोक हिंगे यांनी मराठा मुस्लिम आणि धनगर समाजाच्या आरक्षणाबाबतीमध्ये बॉण्डवर शपथ पत्र दिल्याने या निवडणुकीत मोठी चुरस निर्माण झाली आहे. त्यामुळे अशोक शिंदे यांना मराठा समाजासह मुस्लिम आणि धनगर समाजाचा ही पाठिंबा मिळण्याची शक्यता आहे.

### शरद पवार यांचं कुटुंब फोडलं, चिन्ह चोरलं - रोहित पवार

शहापूरःराष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी रविवारी भाजप आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या गटावर सडकून टीका केली. रोहित पवार यांनी शरद पवार यांचं कुटुंब फोडलं. त्यांनी दरोडा टाकला. आपलं चिन्ह चोरलं.

# जातीसाठी साथी की जोडायची विकासाची नाती

## लोकशाहीचा आज सर्वात मोठा उत्सव; २१ लाख मतदार बजावणार आपला हक्क




बीड । प्रतिनिधी

**लोकशाहीच्या सर्वात मोठ्या उत्सवासाठी आज दि. १३ मे रोजी मतदान होत आहे. जिल्ह्यातील २१ लाख ४२ हजार ५४७ मतदार आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत. या निवडणुकीला जातीय रंग आला असून जातीसाठी साथी की जोडायची विकासाची नाती हे ठरवणारा हा दिवस असणार आहे. मतदानासाठी प्रशासन सज्ज झाले असून प्रत्येक बुथवर करडी नजर राहणार आहे.**

बीड लोकसभा मतदार संघासाठी सोमवारी मतदान होणार असून ही निवडणुक विकासाच्या मुद्दयाऐवजी जातीय मुद्दयावर होत आहे. दोन्ही बाजूने जातीवाद होत असल्याचा आरोप होत असून सोशल मिडीयावर तर दोन्ही समाजाच्या तरुणांनी अतिरेक केले असल्याचे चित्र आहे.

आतापर्यंत लोकसभा निवडणुक ही विकासाच्या मुद्दयावर लढवली जात होती. मात्र यावेळी निवडणुकीच्या अगोदर राज्यात मराठा आरक्षणाचा लढा उभा राहीला. मनोज जरांगे यांचे नेतृत्व समाजाला मिळाले. आंदोलनाच्या माध्यमातून त्यांनी राज्य ◄◄ पान २ वर

### असा असेल फौजफाटा

अप्पर पोलिस अधिक्षक ०२, उपविभागीय पोलिस अधिकारी ०७, पोलिस निरीक्षक १८, सहाय्यक पोलिस निरीक्षक, उपनिरीक्षक २२०, पोलिस अमलदार ३३७३, होमगार्ड २१९४, केंद्रीय सशस्त्र बल ०७ कंपनी, दंगल नियंत्रण पत्रक ०६, जलद प्रतिसाद पथक ०२, पोलिस वाहने २७३

### मतदार संख्या २१ लाख ४२ हजार ५४७

- मतदान केंद्र २३५५
- अधिकारी, कर्मचारी १०४३२

# माजलगावात पोलीसांनी ५२ लाखांचा गुटखा पकडला

## उपविभागीय पोलिस अधिकारी बी. धीरजकुमार यांच्या पथकाची कारवाई

माजलगाव । प्रतिनिधी

**बिदर (कर्नाटककडून) डाक पार्सल वाहनाने जालना शहराकडे जाणारा ५२ लाखांचा गोवा गुटखा पोलिसांनी पकडला. ही कारवाई माजलगाव उपविभागीय पोलिस अधिकारी आयपीएस बी. धीरजकुमार यांच्या पथकाने दि. १२ मे रविवार रोजी सकाळी ९:३० वाजता माजलगाव शहरानजीक परभणी टी पॉइंट येथे केली.**



याबाबत समजलेली माहिती अशी की, पोलिसांना खबऱ्यामार्फत टीप मिळाली की, एम.एच.२३.बी.जी.६७२३ का क्रमांकाच्या मोठ्या डाक पार्सल टेम्पोने गोवा गुटखा हा (बिदर) कर्नाटक वरून माजलगाव शहरातून जाणार आहे. या माहितीवरून माजलगाव पोलिसांनी दि.१२ मे रविवार रोजी सकाळी परभणी टी पॉईंट येथे सापळा लावला. यावेळी ९:३० वाजता ◄◄ पान २ वर

# महाराष्ट्रासह विविध राज्यांत विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज

नवी दिल्ली । वृतसंस्था

**पुढील ३ दिवस महाराष्ट्रासह विविध राज्यांमध्ये विजांच्या कडकडाटासह पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. देशात एकीकडे उन्हाचा तडाखा वाढत असताना हवामान विभागाने हा इशारा दिला आहे. तसेच हवामान खात्याच्या माहितीनुसार, चांगल्या मान्सूनची चिन्हे दिसू लागली आहेत. तसे बदल प्रशांत महासागर आणि हिंदी महासागरात दिसू लागले आहेत.**

हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजानुसार १३ मे ला महाराष्ट्रासह उत्तराखंड, छत्तीसगड, तेलंगणा, कर्नाटक, हिमाचल प्रदेशात विजांच्या कडकडाटासह पाऊस होऊ शकतो. तर हरियाणा, दिल्ली आणि उत्तर प्रदेशात धुळीचे वादळ येण्याची



शक्यता आहे. यावेळी ताशी ४० किलोमीटर वेगाने वारे वाहू शकतात. १४ मेरोजी छत्तीसगड, गुजरात, मध्य प्रदेश, गोवा आणि कर्नाटकमध्ये वादळाची शक्यता. तसेच छत्तीसगड, गुजरात, मध्य प्रदेश, गोवा आणि कर्नाटकमध्ये वादळ येण्याची शक्यता आहे. त्या ठिकाणी वारे ४० ते ५० किलोमीटर प्रतितास वेगाने वाहू शकतात. याच दिवशी महाराष्ट्र, ◄◄ पान २ वर

## बाजारभाव

बीड,दि.९ मे २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

कृषि उत्पन्न बाजार समिती,

| किमान | कमाल | सरासरी |
| --- | --- | --- |
| गहू : ४४.०० क्विंटल | | |
| २,२५० | २,६७० | |
| ज्वारी/हायब्रिड : १६५.५० क्विंटल | | |
| १,७०० | ३,५८० | २,४८८ |
| मूग : ०.५० क्विंटल | | |
| ९,८५० | ९,८५० | ९,८५० |
| तूर : ८०.०० क्विंटल | | |
| ४,५०० | १०,९६३ | |
| उडीद : ५.५० क्विंटल | | |
| ७,९०० | ७,९०१ | ७,९०० |
| बाजरी: ७९.५० क्विंटल | | |
| २,०८५ | २,८०१ | २,४७७ |
| चिंच/लोकल: १०.०० क्विंटल | | |
| ६,५०० | ६,५०० | ६,५०० |
| सोयाबीन: २१६.०० क्विंटल | | |
| ४,५७५ | ४,६०१ | ४,५८५ |
| हरभरा: ५.०० क्विंटल | | |
| ५,६०० | ६,१०० | ५,७८७ |

# देशभरात २०० युनिट वीज मोफत देणार !

## अरविंद केजरीवाल यांनी जाहिर केली १० आश्वासनांची हमी

नवी दिल्ली । वृतसंस्था

**पाचव्या टप्प्यात दिल्लीत लोकसभा निवडणूकीसाठी मतदानाची प्रक्रिया पार पाडण्यात येणार आहे. त्यामुळे दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी रविवारी लोकसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर १० आश्वासनांची हमी जनतेला दिली. यामध्ये देशभरात २०० युनिट वीज मोफत देण्याच्या घोषणेसोबतच इतर बाबींचा समावेश आहे.**

काँग्रेसने आपला जाहिरनामा प्रसिद्ध करताना देशातील सर्व वर्गाचा विचार करून प्रमुख अशा १० प्रश्नांवर देशातील जनतेला हमी दिली. त्याच पध्दतीने अरविंद केजरीवाल यांनीही देशासाठी १० हमींची घोषणा केली आहे. ज्यात वीज, चांगल्या शाळा, उत्तम आरोग्य, पायाभूत सुविधा,




शेतकऱ्यांसाठी एमएसपी, अग्निवीर योजना बंद करणे, भ्रष्टाचार संपवण्यासाठी भाजपाचे ''वॉशिंग मशीन'' नष्ट करणे आणि २ कोटी नोकऱ्या आदी १२ आश्वासने दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांनी आम आदमी पार्टीच्यावतीने दिली. यावेळी बोलताना अरविंद केजरीवाल म्हणाले की, मला पंतप्रधान व्हायचे नाही पण माझी हमी आहे की जेव्हा भारत आघाडी सरकार स्थापन करेल तेव्हा मी ही आश्वासने पूर्ण होतील याची खात्री करेन. इंडिया ब्लॉकच्या भागीदारांशी या हमींवर चर्चा केली आहे का असे विचारले असता, अरविंद केजरीवाल म्हणाले की, त्यांना वेळ मिळाला नाही, परंतु ते आक्षेप घेणार नाहीत असा विश्वास आहे. ''केजरीवालची हमी हा एक ब्रँड आहे कारण आम्ही दिल्ली आणि पंजाबमध्ये मोदींच्या गॅरंटीपेक्षा वेगळे काम केले आहे,'' असेही अरविंद केजरीवाल म्हणाले.

cmyk

अग्रलेख

# मतदानाचा टक्का वाढावा...

महाराष्ट्रातील मतदानाची घसरलेली टक्केवारी चिंतेचा विषय ठरत आहे. नागरिक मतदान करण्यासाठी घराबाहेर का पडले नाहीत, याचा विचार निवडणूक आयोग आणि सर्वच राजकीय पक्षांनी करणे गरजेचे आहे. आगोदरच्या तीन टप्प्यात झालेले मतदान टक्का घसरल्याचेच सांगते. आज १३ मे रोजी चौथ्या टप्प्याचे मतदान पार पडत आहे. या वेळेस तरी मतदानाचा टक्का वाढावा अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

मतदान का कमी झाले आता याबाबत वेगवेगळे अंदाज बांधले जाऊ लागले आहेत. मतदारांमध्ये उत्साह निर्माण करू शकेल असा मुद्दा प्रचारामध्ये आणण्यात सगळेच पक्ष अपयशी ठरले. ग्रामीण भागात प्रस्थापितांविरोधात राग आहे. मात्र २०१४ मध्ये जशी लाट निर्माण झाली होती, तशा तीव्र स्वरूपाची लाट निर्माण होऊ शकलेला नाही. मतदार याद्यांमधील गोंधळ, मतदान केंद्रे न सापडणे यामुळेही टक्केवारीवर परिणाम झाला आहे. ग्रामीण भागात झालेला प्रचार हा राष्ट्रीय मुद्यांऐवजी स्थानिक मुद्यांभोवती फिरणारा दिसला. प्रचाराचा जो आवेग पाहायला मिळत होता, तो फक्त माध्यमांमध्येच दिसत होता. हाच आवेग प्रत्यक्षात दिसला नाही. जिथे चुरशीची लढत आहे, तिथे मतदारांनी मतदानामध्ये उत्साह दाखवल्याचे मतदानाच्या आकडेवारीतून दिसून येत आहे. दुसरे म्हणजे सत्ताधारी पक्षाबद्दल लोकांमध्ये नाराजी असेल आणि लोकांना पर्यायही फारसा पसंत नसेल तर मतदानात मतदारांचा निरुत्साह जाणवतो. यावेळच्या निवडणुकीत पहिल्या दोन आणि तिसऱ्या टप्प्यातही मतदारांचा निरुत्साह जाणवल्याने मतदान वाढवण्यासाठी निवडणूक आयोगाने विविध उपाययोजना राबवल्या. उष्णतेच्या लाटेमुळे पहिल्या दोन टप्प्यात कमी मतदान झाल्याचा अंदाज आयोगाने लावला होता. त्या अनुषंगाने तिसऱ्या टप्प्यात मतदान वाढवण्यासाठी उपाययोजना करूनही मतदान वाढले नाही. याचा अर्थ सत्ताधारी पक्षाबद्दल मतदारांमध्ये नाराजी असण्याची शक्यता आहे, असे म्हणण्यास वाव आहे.

कोणत्याही निवडणुकीत उमेदवाराचा विजय किंवा पराभव हा मतांच्या आधारे ठरवला जातो. साहजिकच, प्रत्येक मताचे स्वतःचे मोल आहे. मतदानाची टक्केवारी जास्त राहिल्यास निकालाचा आकृतिबंध वेगळा असू शकतो. त्यामुळे निवडणूक आयोगही मतदारांना मतदानात सक्रिय सहभाग होण्यासाठी आवाहन करण्याबरोबरच प्रोत्साहनही देत असतो, तरी हे सर्व प्रयत्न प्रत्यक्षात उतरताना दिसत नाहीत. लोकशाहीच्या दृष्टीने ही चिंताजनक स्थिती आहे. कमी मतदानाच्या समस्येबद्दल चिंतित असलेल्या निवडणूक आयोगाने उपलब्ध माहितीच्या पृथक्करणातून या सार्वत्रिक निवडणुकीत देशातील ११ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील २३६ जागांची निवड केली. ज्याठिकाणी गेल्या सार्वत्रिक निवडणुकीत मतदानाची टक्केवारी राष्ट्रीय सरासरीपेक्षा म्हणजे ६७.४० टक्क्यांपेक्षा कमी होती, या जागांमध्ये २१५ ग्रामीण आणि ५१ शहरी लोकसभा मतदारसंघांचा समावेश आहे. निवडणूक आयोग मतदानाचा टक्का वाढावा, यासाठी त्यांच्याकडे उपलब्ध संसाधनांच्या मदतीने पुरेपूर प्रयत्न करत असतो. अनेकदा हे प्रयत्न लोकांसमोर येत नाहीत. उदाहरणार्थ, सीमेलगत असलेल्या अरुणाचल प्रदेशमधील मालोगाम गावातील केवळ एका मतदारासाठी निवडणूक आयोगाला ३९ कि.मी.ची पायपीट करावी लागते. घनदाट जंगल, डोंगररांगा, बर्फाळ प्रदेश, नद्यांची मोठी पात्रे ओलांडून, तर दुर्गम भागात कित्येक कि.मी. चालत, हत्ती, घोड्यावरून किंवा हेलिकॉप्टरने जाऊन तिथे मतदान केंद्रे स्थापन केली जातात. हिमाचल प्रदेशातील लाहौल आणि स्पितीमधील ताशीगँग या १५ हजार २५६ फूट उंचीवर असलेल्या ठिकाणी जगातील सर्वात उंच मतदान केंद्र स्थापन करण्यात येते. ताशीगँग येथे केवळ ५२ मतदार असून त्यांच्यासाठी ही सोय करण्यात येते. हिमाचल प्रदेशात समुद्रसपाटीपासून १० ते १२ हजार फूट उंचीवरील भागांमध्ये ६५ मतदान केंद्रे आणि १२ हजार फुटाहून उंच ठिकाणी २० मतदान केंद्रे तयार केली जातात. दुसरीकडे, लहान बेटावरील लोकांना मतदान करता यावे म्हणून शिपिंग कंटेनरमध्ये मतदान केंद्र स्थापन केले जाते.

यंदाच्या लोकसभा निवडणुकांतही अशीच व्यवस्था असणार आहे, तरीही देशभरातील केवळ दोन तृतीयांश मतदारांनाच मतदानाचा हक्क बजावता येत असेल, तर ती आदर्श परिस्थिती म्हणता येणार नाही; परंतु खेदाची बाब म्हणजे लोकसभेच्या जवळपास निम्म्या जागांवर मतदानाचे प्रमाण त्याहूनही कमी आहे. यावरून त्या भागातील विजयी उमेदवार किती लोकांचे प्रतिनिधित्व करत असतील, हे समजू शकते.

लोकशाहीत मतदानाच्या हक्काबाबत नागरिकांमध्ये जागरुकता नसल्यामुळे किंवा इतर कारणांमुळे एवढ्या मोठ्या संख्येने मतदार निवडणूक प्रक्रियेपासून दूर राहताना दिसतात. या पार्श्वभूमीवर एकूण लोकसंख्येपैकी किती लोकसंख्येचा शासन रचनेत सहभाग आहे, याचा विचार करण्याची गरज आहे. अशा स्थितीत मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी निवडणूक आयोगाचे प्रयत्न स्वागतार्ह असले, तरी त्याचे प्रत्यक्ष परिणामही जमिनीवर दिसायला हवेत. अर्थात, याबाबत मतदारांची जबाबदारीही मोठी आहे. मतदानाचा हक्क हा मूलभूत हक्क असून तो महत्प्रयासाने आपल्याला मिळालेला आहे. निवडणुकीच्या काळात तो बजावला जात नसेल, तर अशा नागरिकांना राजकीय व्यवस्थेविषयी, लोकप्रतिनिधींविषयी टीकाटिप्पणी करण्याचा नैतिक अधिकार राहत नाही, हे लक्षात घ्यायला हवे.

## ओळखपत्र दाखवून मतदान करता येते-जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

**लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ सुरू असून चौथ्या टप्प्यातील सोमवार दिनांक १३ मे रोजी ३९ बीड या मतदारसंघात मतदान होणार आहे.**

भारतीय निवडणूक आयोगाने नमूद केलेल्या ओळखपत्राच्या आधारे मतदान करता येते असे जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांनी कळविले आहे. यानुसार अधिकाधिक मतदारांनी मतदान प्रक्रियेत भाग घेऊन आपले अमूल्य योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले आहे. भारतीय निवडणूक आयोगाने मतदारांसाठी काही सुविधा उपलब्ध करून दिलेली असून मतदान ओळखपत्र एपीक कार्ड व्यतिरिक्त काही दुसरे ओळखपत्र असल्यासही मतदान करता येते असे जाहीर केलेले असल्याचे जिल्हा निवडणूक निर्णय अधिकारी यांनी सांगितले. यानुसार मतदान एपिक कार्ड व्यतिरिक्त आधार कार्ड, मनरेगाची जॉब कार्ड , कुठल्याही बँकेचे पासबुक ज्यावर मतदाराचा छायाचित्र असेल तसेच पोस्ट ऑफिस चे पासबुक ज्यावर मतदारांचे छायाचित्र असेल. केंद्रीय कामगार मंत्रालयाच्यावतीने दिलेले विमा स्मार्ट कार्ड, वाहन परवाना, पॅन कार्ड, राष्ट्रीय लोकसंख्या नोंदणीकडून रजिस्टर जनरल इंडिया ने दिलेले स्मार्ट कार्ड, पारपत्र, ज्यावर छायाचित्र असेल असे निवृत्तीचे कागदपत्र , शासकीय तसेच निमशासकीय संस्थेकडून कर्मचाऱ्यांचे छायाचित्र असलेले ओळखपत्र, खासदार, आमदार, विधान परिषदेचे सदस्य यांनी छायाचित्रावर दिलेले ओळखपत्र तसेच दिव्यांग व्यक्ती ज्यांना केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाकडून युनिक डेसिबिलिटी ओळखपत्र मिळालेले आहेत. अशा कुठल्याही एका ओळख पत्राचा वापर हा मतदान करतेवेळी मतदान केंद्रात सोबत घेऊन गेल्यास मतदान करता येत असल्याचे बीड जिल्ह्याच्या निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कळविले आहे.

## मराठा की वंजारी नेमका जातीयवाद कोण करतय ?

**महाराष्ट्राच्या राजकारणामध्ये काही प्रमाणात का होईना जातीय सूत्राला महत्व दिले जाते हे तेवढेच कटू सत्य आहे. मात्र बीड जिल्ह्यामध्ये सध्या जी लोकसभा निवडणूक सुरू आहे यामध्ये मोठ्या प्रमाणात जातीवाद होताना दिसत आहे. त्यामुळे हा जातीवाद नेमका मराठा समाज की वंजारी समाज करत आहे? हा प्रश्न दोन्ही समाजाच्या बाजूने विचारला जातो. त्यामुळे आपण या प्रश्नाचं उत्तर मिळवण्याचा प्रयत्न करणार आहोत. की नेमकं जातिवाद कोण करत आहे?**

महाराष्ट्रामध्ये सर्वाधिक वंजारी समाजाची संख्या असलेला बीड जिल्हा हा एकमेव आहे. असं म्हटलं जातं की चार ते साडेचार लाख या मतदारसंघांमध्ये वंजारी समाजाची मतदार संख्या आहे. तर मराठा समाजाची सहा ते साडेसहा लाख मतदार संख्या आहे. दोन्ही समाजाकडून परस्परांवर जातीवादाचा आरोप या निवडणुकीमध्ये मोठ्या प्रमाणात करण्यात येत आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील सामाजिक स्थिती पूर्णतः अस्थिर आहे. प्रत्येकाच्या मनामध्ये अस्वस्थता वाटत आहे. आता आपण पाहूया की नेमकं जे काही घडतंय ते जातीवादी आहे की वेगळा आहे.

अगोदर आपण वंजारी समाजाच्या बाबतीमध्ये चर्चा करूया.

गोपीनाथ मुंडे हे ज्यावेळी १९७८ ते ८० च्या दरम्यान राजकारणामध्ये उदयास आले त्यानंतर आस्थागायत महाराष्ट्रातील वंजारी समाज मुंडे घराण्याला आपलं दैवत आणि नेतृत्व मानतो. मग मुख्य प्रश्न हा आहे की गोपीनाथ मुंडे यांच्या अगोदर बीड जिल्ह्यामध्ये वंजारी समाज नव्हता का? तर याचे उत्तर आहे होताच. मग त्यावेळी वंजारी समाज आपल्याच लोकांना मतदान करत होता की दुसऱ्या? तर याचे उत्तर आहे, जो उमेदवार योग्य वाटत होता त्या उमेदवाराला बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाने मतदान केलेले आहे. मग वंजारी समाजाचा उमेदवार लोकसभा किंवा दुसऱ्या निवडणुकीला उभा होता त्या त्या वेळी वंजारी समाजाने आपल्याच समाजातील उमेदवाराला मतदान केले का? तर याचे उत्तर सुद्धा नाही हेच आहे. तर ते कसे हे मी आपल्याला या ठिकाणी पुराव्यासह सांगणार आहे.

अलीकडच्या काळी १९९९ मध्ये केशरकाकू क्षीरसागर यांच्या विरोधामध्ये सदाशिव मुंडे हे होते. मात्र यावेळी केशरकाकू यांचा विजय झाला. १९९८ मध्ये जयसिंगराव गायकवाड, अशोक पाटील हे उभे असताना रमेश काशीराम कराड हे अपक्ष उभे होते फक्त पाच हजार १५५ मते मिळाली. १९९६ मध्ये रजनीताई पाटील, केशरकाकू क्षीरसागर यांच्यात लढत असताना सुशीलाताई मोराळे सुद्धा उभ्या होत्या. मात्र त्यांना ७३ हजार ९०० मते मिळाली. यातील बहुतेक मते शेकापची होती. याच निवडणुकीत सदाशिव सिताराम मुंडे हे अपक्ष होते मात्र



त्यांना ५२७३ मध्येच पडली. १९९१ साली केशरकाकू आणि सदाशिव मुंडे यांच्या सरळ लढत झाली यामध्ये तब्बल ८० ते ९० हजार मतांनी केशरकाकू विजय झाल्या. यावेळी बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाने मुंडेपेक्षा केशर काकूंना मते दिली. १९८९ मध्ये रोमांचक लढतीमध्ये तीनही उमेदवार ओबीसी होते. केशर काकू क्षीरसागर, अहमदनगर जिल्ह्यातील बबनराव ढाकणे आणि स्थानिक सदाशिव मुंडे यांच्यात लढत झाली. मात्र यावेळी बीड जिल्ह्यातील वंजारी समाजाने सदाशिव मुंडे यांच्या पेक्षा बाहेर जिल्ह्यातील बबनराव ढाकणे व केशरकाकू यांना मते दिली. एकंदरीत या ठिकाणी सांगण्याचा उद्देश आहे की आतापर्यंत ज्या निवडणुकांचा आपण आढावा घेतला त्या निवडणुकीमध्ये वंजारी समाजाचा उमेदवार ज्या ज्या वेळी होते त्या त्यावेळी ज्या पक्षाकडून उभे होते त्या पक्षाचे मतदान आणि काही प्रमाणात वंजारी समाजाचे मतदान त्यांना झाले. मात्र पूर्ण वंजारी समाजाचे मतदान त्यांना झाले नाही हे त्यावरून सिद्ध होते. कारण वंजारी समाजाने पूर्णतः मतदान केले असते तर सदाशिव मुंडे हे १९९१, १९९९ या निवडणुकीमध्ये खासदार झाले असते. तर १९८४ मध्ये अपक्ष उमेदवार श्रीधर गीते आणि १९८० मध्ये रघुनाथ मुंडे हे सुद्धा खासदार झाले असते मात्र या दोघांचाही पराभव केशर काकू यांनी केला. गोपीनाथ मुंडे हे वंजारी समाजाचे नेते असल्यामुळे समाज त्यांना आपलं दैवत मानतो. त्यामुळे ज्यावेळी ते व त्यांच्या कुटुंबातील व्यक्ती लोकसभा निवडणुकीला उभे राहिले त्यावेळी त्यांच्या पाठीशी वंजारी व ओबीसी समाज राहिला. पण यावेळी किंवा यापूर्वी गोपीनाथ मुंडे यांनी सांगितलेल्या इतर कोणत्याही समाजाच्या उमेदवाराला वंजारी समाजाने मतदान केले आहे. त्यावेळी वंजारी समाजाचा उमेदवार समोर असला तरी त्याला मतदान केले नाही हेही तेवढेच वास्तव आहे. महाराष्ट्र मध्ये कोठेही मुंडे साहेबांनी कोणत्याही समाजाचा दिलेला उमेदवाराला वंजारी समाजाने मते दिली आहेत.

दुसरीकडे मराठा समाजाच्या बाबतीमध्ये बोलायचे म्हटले तर समाजामध्ये शरद पवार यांना मोलाचे स्थान आहे. बारामती, माढा किंवा राज्यातील इतर कोणत्याही विधानसभेच्या निवडणुकांमध्ये सुद्धा ज्या ज्या वेळी पवार कुटुंबाच्या विरोधात मराठा समाजातील उमेदवार असेल त्या त्या वेळी मराठा समाजाने पवार कुटुंबालाच साथ दिलेली आहे. मग यावेळी जो पराभूत उमेदवार आहे तो सुद्धा मराठा असतो. मग त्या ठिकाणी पवाराच्या कुटुंबापेक्षा त्यालाच निवडून आणायला हवं होतं पण समाजाची भक्ती ही एखाद्या कुटुंबाशी किंवा व्यक्तीवर असते, हे यावरून दिसून येते. बारामती किंवा पुणे जिल्ह्यामध्ये पवार कुटुंबाच्या विरोधात जर एखादा ओबीसी उमेदवार असेल तर त्याला बारामती किंवा माढा मधील मराठा समाज मतदान करणार नाही. मग त्या ठिकाणी जातीवाद म्हणायचा का तर बिलकुल नाही. तो जातिवाद नसून एखादं घराणं किंवा नेतृत्वाच्या बाबतीमध्ये असलेलं प्रेम असतं हे खऱ्या अर्थाने मला या ठिकाणी सांगायचं आहे. बीड जिल्ह्यामध्ये मुंडे कुटुंबाप्रती वंजारी समाजाचे असलेले प्रेम आणि जिव्हाळा आहे, असं एकंदरीत दिसतं. जर बीड लोकसभेसाठी मनोज जरांगे पाटील हे उमेदवार असते तर मराठा समाजाने त्यांना पाठिंबा दिल्यावर तो जातिवाद ठरला नसता कारण जरांगे पाटील हे सध्या मराठा समाजासाठी शक्ती, भक्ती आणि एक ऊर्जास्त्रोत म्हणून पुढे आलेले आहेत. त्यामुळे जातिवाद आणि त्यांच्याविषयी असलेली भक्ती किंवा जिव्हाळा यामध्ये फार मोठा फरक आहे. खऱ्या अर्थाने हे सुज्ञ मतदारांनी जाणून घ्यायला हवं. कोणत्याही निवडणुकीमध्ये जातीवाद हा कधीही व्हायला नकोय मात्र तो होत आहे हेही तेवढेच दुर्दैव.

## पान १वरून...

### शेतकऱ्यांच्या विकासासाठी

अध्यक्षस्थानी वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. इंद्रमणी होते. तर प्रमुख अतिथी म्हणून अटारी पुणे संचालक डॉ. एस के रॉय, संस्कृति संवर्धन मंडळ सगरोळी व अफार्म पुणे चेअरमन प्रमोद देशमुख, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ परभणी येथील संचालक शिक्षण डॉ.यु एम खोडके, संचालक संशोधन डॉ.खजिर बेग, संचालक विस्तार शिक्षण डॉ. डी एन गोखले, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नांदेड भाऊसाहेब बराटे व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी हिंगोली राजेंद्र कदम यांची प्रमुख उपस्थिती होती. सांस्कृतीक संवर्धन मंडळ कृषी विज्ञान केंद्र सगरोळी, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणी, कृषी विभाग नांदेड, आर.आर.ए नेटवर्क महाराष्ट्र व रिलायन्स फाउंडेशन, दिलासा जनविकास प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने ही परिषद आयोजित करण्यात आली होती. यावेळी मराठवाड्यातील सर्व जिल्ह्यातून बारा कृषी विज्ञान केंद्राचे प्रमुख, सर्व जिल्ह्यांचे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, निवडक शेतकरी व महिला व भरडधान्य प्रक्रिया उद्योजक यांचा सहभाग होता. या परिषदेमध्ये अनेक तज्ज्ञांनी आपली मते मांडली त्यात डॉ. परशुराम पत्रोलटी, प्रमुख शास्त्रज्ञ, केंद्रीय भरडधान्य संशोधन संस्था अंतर्गत ज्वारी संशोधन केंद्र सोलापूर, ज्वारी संशोधन केंद्र परभणीचे चे प्रमुख शास्त्रज्ञ डॉ. एल.एन जावळे, बायफ संस्थेकडून संजय पाटील, भरडधान्य प्रक्रिया उद्योजक एस एस भवानी फूड्स हैदराबाद कडून वीरशेट्टी पाटील मिलेट मॅन ऑफ तेलंगाना, कळसुबाई शेतकरी उत्पादक कंपनी नाशिककडून नीलिमा जोरवार, ॲग्रो झी ऑरगॅनिक कडून महेश लोंढे इत्यादी उद्योजकांनी आपले अनुभव सांगताना प्रक्रिया उद्योगातील संधी विशद केल्या.

---------

### कार्यकर्त्यांना अटक

मतदार आणि पीडीपी समर्थकांना धमकावणे सुरू असून, ते रोखण्यासाठी भारतीय निवडणूक आयोगाकडे हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. नॅशनल कॉन्फरन्स चे उमेदवार आगा सय्यद रुहुल्ला मेहदी यांनी देखील मतदानाच्या एक दिवस अगोदर श्रीनगर लोकसभा जागेवर त्यांच्या समर्थकांना गोळा केले जात असल्याचा आरोप केला. केंद्र सरकारच्या नियंत्रणाखाली असलेले राज्य प्रशासन निर्लज्जपणे मतदारांना आणि पीडीपीच्या समर्थकांना घाबरवण्याच्या कामात गुंतले आहे. पुलवामा आणि शोपियान जिल्ह्यांमध्ये सुरक्षा यंत्रणांनी छापे टाकले आणि पीडीपी कार्यकर्त्यांना त्रास दिल्याच्या बातम्यांमुळे मला खूप त्रास झाला आहे. पक्षाचे असंख्य सदस्य, सहानुभूतीदार आणि कार्यकर्त्यांना औचित्य नसताना मनमानीपणे ताब्यात घेण्यात आले आहे, सार्वजनिक रॅली आयोजित करण्याच्या आणि मतदानाला प्रोत्साहन देण्याच्या त्यांच्या प्रयत्नांची शिक्षा म्हणून, राज्य प्रशासनाकडून या गोष्टी जाणीवपूर्वक करण्यात येत असल्याचा मुद्दा मेहबूबा मुफ्ती यांनी निवडणूक आयोगाला उद्देशून लिहिलेल्या पत्रातून निदर्शनास आणून दिला.

-------------

### मातृ दिनालाच

घेण्याच्या उशिने त्याने पत्नीचे तोंड दाबले. यामध्ये गुदमरून राधाचा मृत्यू झाला. त्यानंतर स्वत: देखील दरवाजा बाहेर असलेल्या हुकाला भागवतने दोरीने गळफास घेतला. सकाळी झोपेतून उठल्यावर त्यांच्या पाच वर्षाच्या चिमुकलीने हा प्रकार बघितला आणि तीने रडायला सुरूवात केली. त्यामुळे खालच्या मजल्यावरील लोक वरच्या मजल्यावर गेले. त्यांनी हा सर्व प्रकार बघितल्यानंतर शिवाजीनगर पोलिसांना कळवले. पोलिसांनी धाव घेत पंचनामा करून दोन्ही मृतदेह जिल्हा रूग्णालयात शवविच्छेदन करण्यासाठी पाठविले. हा वाद कौटुंबिक कारणावरून झाल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले आहे. अधिक तपासानंतर खरे कारण पुढे येईल असेही पोलिसांनी सांगितले. दरम्यान, मातृ दिनाच्या दिवशीच चिमुकली आई - वडिलांविना पोरकी झाल्याने हळहळ व्यक्त होत आहे.

-----------

### मुंडे– महाजनांनंतर बीडला पुन्हा

पण तत्वाशी तडजोड न करण्याच्या भूमिकेत त्यांना केंद्रीय मंत्रीपदाची संधी असतानाही त्यांनी नाकारली. त्यानंतर अंबाजोगाईतून भाजपचे काम करत प्रमोद महाजन यांनी ९०च्या दशकात दिल्ली गाठली. उत्कृष्ट भाषण शैली आणि संघटन या बळावर त्यांनी अल्पकाळात राष्ट्रीय राजकारणात मजबूत पाय रोवले. २५ वर्षाच्या अथक मेहनतीनंतर राष्ट्रीय राजकारणात प्रमोद महाजन यांचे स्थान अढळ झाले. दिवंगत अटल बिहारी वाजपेयी यांच्या सरकारमध्ये ते मंत्री तर पक्षाचे महासचिव म्हणून त्यांनी अनेक वर्षे काम केले. दिल्लीत प्रमोद महाजन यांच्या प्रभावामुळे महाराष्ट्रात गोपीनाथ मुंडे यांना एकतर्फी नेतृत्व करता आले. अटल बिहारी वाजपेयी यांच्यानंतर भावी पंतप्रधान म्हणून तरूण वयात महाजन यांची ओळख निर्माण झाली होती. मात्र अचानक २००६ साली त्यांची हत्या झाली. महाजन यांच्यानंतर भाजपने गोपीनाथ मुंडे यांना राष्ट्रीय उपाध्यक्ष करून दिल्लीच्या राजकारणात सक्रिय केले. २००९ च्या लोकसभा निवडणूकीतून मुंडे यांनी संसदेत प्रवेश केला. पहिल्यांदाच खासदार म्हणून गेल्यानंतर पक्षाने मुंडे यांना लोकसभेत उपनेता म्हणून पहिल्या बाकावर संधी दिली. अल्पकाळात मुंडे यांनीही आपल्या प्रभावी नेतृत्वाने दिल्लीच्या राजकारणात आपले स्थान निर्माण केले. २०१४ च्या निवडणूकीत निवडून गेले आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारमध्ये ग्रामविकास मंत्री पदाची शपथ घेतली. मात्र अवघ्या आठच दिवसात रस्ता अपघातात त्यांचे निधन झाले आणि पुन्हा एकदा दिल्लीच्या राष्ट्रीय राजकारणात नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली. दहा वर्षापासून राष्ट्रीय राजकारणात मराठवाड्याचा दमदार नेता दिसत नाही. अशा परिस्थितीत दिवंगत मुंडे यांच्या राजकीय वारसा चालवणार्या पंकजा मुंडे यांना थेट केंद्रीय नेतृत्वाने यावेळी बीड लोकसभेच्या मैदानात उतरविले आहे. पंकजा यांनी पाच वर्षे महाराष्ट्रात आमदार आणि मंत्री म्हणून दमदार काम केले आहे. महाराष्ट्रासह मध्यप्रदेश, राजस्थान, तेलंगणा, कर्नाटक अशा राज्यामध्ये मुंडेंना मानणार्या समाजामध्ये पंकजा मुंडे प्रचंड लोकप्रिय आहेत. पंकजा यांची नेतृत्व करण्याची क्षमता आणि जनसमर्थन लक्षात घेवूनच पक्षाने त्यांना दिल्लीच्या राजकारणात सक्रिय करण्याचा निर्णय घेतला. तीन वर्षापूर्वी राष्ट्रीय सचिव करून मध्यप्रदेशचे सहप्रभावी करण्यात आले होते. त्यामुळे लोकसभेच्या निवडणूकीनंतर पंकजा यांना केंद्रात मोठी जबाबदारी मिळण्याची शक्यता आहे. भारतीय जनता पार्टीत केंद्रीय स्तरावर दिवंगत अटल बिहारी वाजपेयी व लालकृष्ण अडवाणी यांच्याबरोबरची एक पिढी आता वृध्दापकाळाकडे गेली आहे. सुषमा स्वराज यांच्यानंतर लोकसभेत सर्वसमावेशक महिला नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली आहे. त्यामुळे पंकजा यांच्या माध्यमातून पक्षाला राष्ट्रीय स्तरावर महिला नेतृत्वाची पोकळी भरून काढण्याची संधी मिळणार असल्याने लोकसभेची निवडणूक राष्ट्रीय नेतृत्वाला जन्म देणारी ठरणार आहे. ही बाब बीड जिल्ह्यातील जनतेने विचारात घेणे गरजेचे असल्याचे म्हटले जात आहे. त्यामुळे बीड लोकसभेच्या निवडणूकीकडे राज्याचे नव्हे तर देशाच्या नेतृत्वाचे लक्ष लागले आहे.

--------------------

### जातीसाठी माती की जोडायची

सरकारला नमते घ्यायला भाग पाडले. आरक्षण आंदोलनाची धग निवडणुकीपर्यंत पोहचणार नाही असे म्हटले जात होते. मात्र या लोकसभा निवडणुकीत बीडमध्ये तर जातीय रंग ऐवढा गडद झाला की तो कमी होण्याचे नाव घेत नाही. मराठा व वंजारी सामाजाने एकमेकांवर जातीवादाचे आरोप केले आहे. खऱ्या अर्थाने ही निवडणुक विकासाच्या मुद्दयावर व्हायला हवी, असे मत सामान्य नागरीकांचे आहे. त्यामुळे जातीसाठी माती की जोडायची विकासाची नाती, हे ठरवणारा हा दिवस असणार आहे. बीड लोकसभा मतदार संघात एकूण २१ लाख ४२,५४७ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहे. आज सर्व विधानसभा मतदार संघतील एकुण २३५५ मतदान केंद्रांवरील मतदान अध्यक्ष व त्यांची टीम त्यांना निश्चित केलेल्या मतदान केंद्रांवर रवाना झाली. २३५५ केंद्रांवर १०,४३२ अधिकारी कर्मचारी आपले मतदानाचे काम उद्या पार पाडतील . यामध्ये ११ दिव्यांग मतदान केंद्र , ५५ महिला मतदान केंद्र, २२ युवा मतदान केंद्र चालक आहेत. याशिवाय १ पोलिस तथा १ होमगार्ड कर्मचारी असणार आहे. बीड विधानसभा मतदार संघात असणाऱ्या मतदान केंद्रांच्या केंद्रांध्यक्षांना व चमुला जिल्हा निवडणुक अधिकारी दिपा मुधोळ मुंडे यांनी शुभेच्छा दिल्या. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणुक अधिकारी दीपा मुधोळ मुंडे यांच्या नेतृत्वात प्रशासनातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तसेच निवडणुकीच्या काळात नेमलेले नोडल अधिकारी आपले कर्तव्य पार पाडीत आहे. बीड लोकसभा मतदार संघात ६ विधानसभा मतदार संघ आहे. यामध्ये ६ सहाय्यक निवडणुक अधिकारी असून २२८ गेवराई या विधानसभा मतदार संघाचे ओंकार देशमुख, २२९ माजलगावचे गौरव ईंगोले, २३० बीडच्या कविता जाधव, २३१ आष्टीचे प्रमोद कुदळे, २३२ केजचे दिपक वजाळे, २३३ परळीचे अरविंद लाटकर हे आहेत. जिल्हा निवडणुक अधिकारी यांच्या आदेशाचे तंतोतंत पालन यांना करावे लागत असुन निवडणुकीच्या प्रक्रियेत मतदान व मतमोजणी होईपर्यंत सतर्क राहणार आहेत.

अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी निवडणुकीच्या काळात अत्यंत महत्वाचे प्रशिक्षण व व्यवस्थापन तसेच अत्यंत क्लिष्ट अशा ईव्हीएम मशिन प्रणाली अंतर्गत येणाऱ्या कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट व व्हिव्हिपॅट यंत्रांचे सरमिसळ झाल्यानंतर विधानसभानिहाय वाटप करण्यात आले.

आदर्श आचार संहिता कक्षाचे प्रमुख वासुदेव सोळंके यांच्याकडे लोकसभा मतदारसंघात आदर्श आचार संहितेचे पालन व्हावे याचे कटाक्षाने नियोजन करण्यात आले. या अंतर्गत कायदा व सुव्यवस्था राखण्याचे कामही त्यांच्या कक्षाकडून झाले.

बीड जिल्ह्यातील उप. प्रादेशिक परिवहन अधिकारी, स्वप्नील माने यांच्याकडे वाहतुक व संपर्क व्यवस्था कक्षाची जबाबदारी सोपविण्यात आली होती. याअंतर्गत ईव्हीम मशिन सहा विधानसभा मतदार संघातील स्टॉग रुममध्ये पोहचवणे . मतदान केंद्रात असणारे मतदान केंद्र अध्यक्ष तसेच त्यांचे सहाय्यक यांना बॅलेट युनिट, कंट्रोल युनिट व व्हीव्हीपॅट या यंत्रसामग्रीसह त्यांच्या मतदान केंद्रावर सुरिक्षितपणे पोहचविणे तसेच मतदान झाल्यावर मतदान यंत्रांसह विधानसभा मतदार संघांच्या मुख्यालयाच्या ठिकाणी पोहचविण्याची जबाबदारी पार पाडणार आहेत.

हेल्प लाईन तक्रार निवारण कक्षाचे महत्वपुर्ण काम जिल्हा नियोजन अधिकारी डॉ. सुधाकर चिंचाणे यांच्या नेतृत्वात त्यांच्या चमुने केलेले आहे. आता त्यांच्याकडे शासकीय तंत्रनिकेतन येथील स्टाँगरुम मधली ठराविक जबाबदारी सोपविलेली आहे. मतदान झाल्यानंतर त्यांची ही जबाबदारी सुरू होईल.

मतदानाच्या दिवशी १३ मे रोजी मतदान केंद्रांवर प्रथमोपचार सोयी सुविधा पथक व वैद्यकीय पथक असावे याची संपुर्ण काळजी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक बडे हे घेणार आहेत.

मतदान केंद्रांवर निश्चित किमान सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगितादेवी पाटील यांची आहे. या अंतर्गत मतदान केंद्रांवर पिण्याच्या पाण्याची सुविधा, अंगणवाडीची सुविधा, व्हिलचेअरची सुविधा असणे अपेक्षित आहे. त्याप्रमाणे त्यांच्या कक्षाकडून २३५५ मतदान केंद्रात केले जात आहे.

बीड लोकसभा मतदार संघाकरीता उमेदवार निवडणुक खर्च निरिक्षण व संनियंत्रण पथकाचे प्रमुख जिल्हा परिषदेचे मुख्य लेखा व वित्त अधिकारी एस. जी. केंद्रे हे आहेत. उमेदवारांचे लेखे तपासण्याचे अर्थपुर्ण काम त्यांच्याकडे आहे. त्यांना सहकार्य म्हणुन सहाय्यक लेखाअधिकारी जी. डी. मंदे, बी. आर. कुलकर्णी, ए.व्ही. कांबळे, श्रीमती एस. बी. खेडकर, आर.एम. भोसले, बी.के.गिरी हे आहेत.

निवडणुकीच्या काळात अनधिकृत सापडलेल्या रक्कमेसाठी कॅश रिलिज समिती नेमली जाते. या समितीमध्ये अपर जिल्हाधिकारी त्रिगुण कुलकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, तहसिलदार (सर्वसाधारण) श्रीमती तेजस्विनी जाधव, लेखाधिकारी (अंलेप) ए.एन.अंजान, जिल्हा कोषागार अधिकारी महेश बाब्रस, आयकर अधिकारी सुदर्शन बडगमवार, विधी अधिकारी सुनिल देशमुख या वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे.

**कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी तगडा बंदोबस्त**

लोकसभा निवडणुक २०२४ अनुषंगाने बीड जिल्हयात कायदा व सुव्यवस्था बंदोबस्त च्या दृष्टीकोनातुन पोलिस अधिक्षक नंदकुमार ठाकुर यांच्या निर्देशाप्रमाणे मतदान करिता बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. अपर पोलीस अधीक्षक–०२, उपविभागीय पोलीस अधिकारी– ०७, पोलीस निरीक्षक –१८, सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस उपनिरीक्षक–२२०, पोलीस अंमलदार ३३७३, होमगार्ड –२१९४, पॅरामिलीटरी फोर्स / केंद्रिय सशस्त्र बल –०७ कंपनी, दंगल नियंत्रन पथक ०६, जलद प्रतिसाद पथक–०२, पोलीस वाहने –२७३ असा बंदोबस्त लावण्यात आलेला आहे. बीड जिल्हयात ठिकठिकाणी नाकाबंदी, चेकपोस्ट नेमण्यात आलेले आहेत. सर्व बंदोबस्तावर पोलीस अधीक्षक बीड हे करडी नजर ठेऊन आहेत. बीड जिल्हयातील सर्व मतदारांनी निर्भयपणे मतदान करावे असे आवाहन करण्यात येत आहे. कोणत्याही समाजकंटकांनी मतदान प्रक्रियेमध्ये बाधा आणल्यास कायद्यान्वये कार्यवाही केली जाणार आहे.

**सोशल मिडीयावर सायबर सेलची करडी नजर**

सदर लोकसभा निवडणुक संदर्भाने सोशल मिडीयावर सायबर सेल बीड बारकाईने लक्ष ठेऊन आहे. काही गैर प्रकार आढळून आला तर त्याची चौकशी होऊन तातडीने कारवाई केली जाणार आहे.

**अधिकचे कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट, व्हिव्हिपॅय यंत्रे**

बीड लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांची संख्या ४१ पर्यंत गेल्याने अधिकचे कंट्रोल युनिट, बॅलेट युनिट व व्हिव्हिपॅट यंत्रे मागविण्यात आलेले आहेत. या आलेल्या सीयु, बीयु व व्हिव्हिपॅट यांचे पुन्हा सरमिसळ करून विधानसभानिहाय वाटप करण्यात आले. अशा एकुण ८६८१ बीयु, ३३१७ सीयु, ३५६९ व्हिव्हिपॅटचे सरमिसळ झाले आहे.

--------------

### महाराष्ट्रासह विविध राज्यांत

छत्तीसगड, गुजरात, आंध्र प्रदेश आणि तेलंगणामध्ये विजांचा कडकडाटही असण्याची शक्यता आहे. उष्णतेचा परिणाम गुजरातमध्ये दिसून येणार आहे. तर १५ मेला ईशान्येकडील राज्यांमध्ये विजांच्या कडकडाटाचा इशारा देण्यात आला आहे. ओडिशासह ईशान्येकडील सातही राज्यांमध्ये पाऊस आणि विजांचा कडकडाट होऊ शकतो. महाराष्ट्र, मध्य प्रदेश, छत्तीसगड, गुजरात, तेलंगणा आणि गोव्यातही धुळीचे वादळ येण्याची शक्यता आहे. तामिळनाडू, पाँडीचेरी, केरळमध्ये मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

-----------

### माजलगावात पोलीसांनी ५२

बंद पॅक असलेला संशयित डाक पार्सल टेम्पो पोलिसांना दिसला. पोलिसांनी वाहन चालकाकडे चौकशी करून टेम्पो पोलीस ठाण्यात नेला. दरम्यान टेम्पो मध्ये पोलिसांना गोवा गुटख्याचे ५० भोत मिळून आले. ज्यात असणाऱ्या गोवा गुटख्याची अंदाजीत किंमत ३७ लाख ५० हजार आहे. वाहन मुद्देमालाची किंमत १५ लाख रुपये एवढी आहे. हा गुटखा जालना येथील संदीप लकडे या व्यक्तीकडे जाणार असल्याची माहिती ड्रायव्हरने पोलिसांना दिली. दरम्यान पोलीस शिपाई टी. एस. कानतोडे यांच्या फिर्यादीवरून वाहन चालक जयदत्त लिंबाजी ओठले (रा. सोमवाडी अंबाजोगाई) विरुद्ध माजलगाव शहर पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला. ही कारवाई आयपीएस बी. धीरज कुमार यांच्या मार्गदर्शनाखाली पो. शि. आशिषकुमार देशमुख, पोशि ए.एन.मिसाळ, पो.शि.आर. एस.कोकाटे यांनी पार पाडली.

**पोलीस यंत्रणा निवडणूकीत व्यस्त आहे, असा समज करून तस्करी**

चौथ्या टप्प्यातील लोकसभेची निवडणूक प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेत प्रशासन, पोलिस यंत्रणा पुर्णपणे व्यस्त असेल असा समज करून एवढा मोठा गुटखा तस्करी करण्याची रिस्क घेण्यात आली. परंतु गुटखा माफीयाचा हा समज पोलिसांनी मोडून काढत ही मोठी कारवाई केली.

-----------

### तुतारीसाठी मराठा

करण्यासाठी सोमवारी सकाळपासूनच मतदार राजा घराबाहेर पडणार आहे. बजरंग सोनवणे यांना जिल्हाभरातून व विविध स्तरातून पाठिंबा वाढत असून खासदार होणार असा विश्वास मराठा समाजासह त्यांच्या कार्यकर्त्यांना आहे.

# सोन्याचे दुकान फोडले ;लाखोंचा ऐवज चोरी

**परळी । प्रतिनिधी**

परळी तालुक्यातील धर्मापुरी येथील श्री साई ज्वेलर्स या दुकानात अज्ञात चोरट्यांनी शटरचे कुलूप तोडून दुकानातील लाखो रुपयांचा सोन्या-चांदीचा ऐवज लंपास केल्याची घटना घडली असून या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार प्रदीप पांडुरंग दहिवाळ यांचे धर्मापुरी येथे श्री साई ज्वेलर्स नावाचे सोने-चांदी विक्रीचे दुकान असून नेहमी प्रमाणे ते शुक्रवारी (दि १०) रोजी रात्री आपले कामकाज आवरून दुकान बंद करून घरी गेले असता शनिवार (दि ११) रोजी पहाटे ०४.३५ते ०४.४५ च्या सुमारास अनोळखी अज्ञात चार चोरटयांनी तोंडास काळे कपडे बांधुन दुकानाचे कुलुप तोडुन शटर उचकून आत प्रवेश केला. दुकानात ठेवलेले सोन्याच्या नथनी, अंगठ्या, चांदीच्या वाट्या,ग्लास,चमचे,जोडवे,चैन असा तब्बल १ लाख ५० हजाराचा ऐवज १० मिनिटात लंपास करून पोबारा केला. या प्रकरणी प्रदीप दहिवाळ यांच्या फिर्यादी वरून ग्रामीण पोलीस ठाण्यात गुरंन १३४/२०२४ कलम ४५७,३८० भादवी नुसार अज्ञात चार चोरट्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून याप्रकरणी सीसीटीव्ही फुटेज ची मदत घेत अधिक तपास ठाण्याचे सपोनि जाधव हे करत आहेत.

# बीएसएनएलच्या निष्क्रिय अधिकाऱ्यांवर कारवाई करा

## नातेवाईक व नागरिकांचे तहसील कार्यालयासमोर ठिय्या आंदोलन

प्रतिनिधी।धारूर

बीएसएनएलचे टॉवर घरावर पडून झालेल्या अपघातात राधाकौर गोके या ८ वर्षे या मुलीचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी दुपारी घडली होती . .बीएसएनएलच्या निष्काळजीपणामुळे हा प्रकार घडल्यामुळे नातेवाईकांनी रविवारी दुपारी साडेतीन वाजता तहसिल कार्यालयासमोर ठेवले होते .तहसीलदार यांच्या लेखी आश्वासनानंतर दोन तासानंतर मुलीच्या प्रेतावर अंत्यविधी करण्यात आले.

धारूर येथे शनिवारी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला होता .या पावसामध्ये झालेले बीएसएनएलचे टॉवर संभाजीनगर भागातील शिकलकरी वस्तीतील आठ घरावर कोसळले होते . यामध्ये आठ जण जखमी झाले होते .त्यातील राधा कौर या मुलीचा अंबाजोगाई येथे उपचारा दरम्यान मृत्यू झाला होता .उत्तरीय तपासणीनंतर नातेवाईकांनी बीएसएनएलच्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी या मागणीसाठी दुपारी साडेतीन वाजण्याच्या दरम्यान मुलीचे प्रेत तहसील कार्यालयासमोर ठेवले होते या वेळी अधिकाऱ्यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली होती .यानंतर तहसीलदार जीवक कुमार कांबळे यांनी मयत मुलीच्या नातेवाईकांना शासनाच्या नैसर्गिक आपत्तीतून मदत, तसेच जखमींना आर्थिक मदत, ज्या घरांचे नुकसान झाले आहे त्यांना नियमानुसार मदत देण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांनी मुलीचा मृतदेहासह तहसील कार्यालयासमोर सुरू केलेले आंदोलन मागे घेतले .सायंकाळी मुलीवर अंत्यसंस्कार करण्यात आला .

दुपारची वेळ होती , मोठा अनर्थ टळला

शनिवारी दुपारी वादळी वाऱ्यासह पावसात बीएसएनएलचे टॉवर आठ घरावर कोसळून आठ घरा चा चुरा झाला होता . यात घरी थांबलेले लहान मुले जखमी झाले होते .यावेळी या घरातील महिला व पुरुष मजुरीच्या कामानिमित्त बाहेर गेल्यामुळे या मोठ्या अपघातातून बचावले आहेत .मजुरीसाठी बाहेर गेल्यामुळे त्यांच्यावरील मोठे संकट लेखी आश्वासनानंतर तहसील कार्यालया समोरील ठिय्या आंदोलन मागे .

दोन तास मुलीचे प्रेत तहसील कार्यालय समोर ठेवले.



### तहसीलदारांच्या लेखी आश्वासनानंतर तहसील कर्यालयासमोर ठिय्या आंदोलन मागे

### दुपारची वेळ होती, मोठा अनर्थ टळला

शनिवारी दुपारी वादळी वाऱ्यासह पावसात बीएसएनएलचे टॉवर आठ घरावर कोसळून आठ घरा चा चुरा झाला होता . यात घरी थांबलेले लहान मुले जखमी झाले होते .यावेळी या घरातील महिला व पुरुष मजुरीच्या कामानिमित्त बाहेर गेल्यामुळे या मोठ्या अपघातातून बचावले आहेत .मजुरीसाठी बाहेर गेल्यामुळे त्यांच्यावरील मोठे संकट टळल्याचे येथील नागरिकांनी सांगितले .

बीएसएनएलचे टॉवर घरावर पडून झालेल्या अपघातात राधाकौर गोके या ८ वर्षे या मुलीचा मृत्यू झाल्याची घटना शनिवारी दुपारी घडली होती . .बीएसएनएलच्या निष्काळजीपणामुळे हा प्रकार घडल्यामुळे नातेवाईकांनी रविवारी दुपारी साडेतीन वाजता तहसिल कार्यालयासमोर ठेवले होते .तहसीलदार यांच्या लेखी आश्वासनानंतर दोन तासानंतर मुलीच्या प्रेतावर अंत्यविधी करण्यात आले.

धारूर येथे शनिवारी दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला होता .या पावसामध्ये झालेले बीएसएनएलचे टॉवर संभाजीनगर भागातील शिकलकरी वस्तीतील आठ घरावर कोसळले होते . यामध्ये आठ जण जखमी झाले होते .त्यातील राधा कौर गोके या मुलीचा अंबाजोगाई येथे उपचारा दरम्यान मृत्यू झाला होता .उत्तरीय तपासणीनंतर नातेवाईकांनी बीएसएनएलच्या अधिकाऱ्यावर कारवाई करावी या मागणीसाठी दुपारी साडेतीन वाजण्याच्या दरम्यान मुलीचे प्रेत तहसील कार्यालयासमोर ठेवले होते या वेळी अधिकाऱ्यांच्या विरोधात घोषणाबाजी करण्यात आली होती .यानंतर तहसीलदार जीवक कुमार कांबळे यांनी मयत मुलीच्या नातेवाईकांना शासनाच्या नैसर्गिक आपत्तीतून मदत, तसेच जखमींना आर्थिक मदत, ज्या घरांचे नुकसान झाले आहे त्यांना नियमानुसार मदत देण्याचे लेखी आश्वासन दिल्यानंतर नातेवाईकांनी मुलीचा मृतदेहासह तहसील कार्यालयासमोर सुरू केलेले आंदोलन मागे घेतले .सायंकाळी मुलीवर अंत्यसंस्कार करण्यात आला.

# गुरुवर्य महादेवानंदजी भारती महाराज यांचा अभिष्टचिंतन सोहळा बुधवारी

**पिंपळवंडी । प्रतिनिधी**

पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथील श्री क्षेत्र अश्वत्थलिंग संस्थांनचे मठाधिपती श्री.स्वामी ह.भ.प.गुरुवर्य महादेवानंदजी भारती महाराज यांचा अभिष्टचिंतन सोहळा प्रतिवर्षाप्रमाणे दि.१५ मे २०२४ बुधवार रोजी येथील श्री.स्वामी अमृत भारती माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाच्या प्रांगणात मोठ्या उत्साहात व भव्य- दिव्य साजरा करण्याचे आयोजन केले असून या कार्यक्रमाला परिसरातील सर्व भाविक-भक्तांनी उपस्थित राहावे



अशी विनंती महादेवानंद भारती महाराज भक्त परिवार सर्व तरुण मंडळ तसेच समस्त पिंपळवंडी ग्रामस्थ व पंचक्रोशी मंडळ यांनी केली आहे. यानिमित्त दुपारी ४ ते ६ या वेळेत महंत महादेवानंदजी महाराज यांची श्री क्षेत्र अश्वत्थलिंग मंदिरापासून कार्यक्रम स्थळापर्यंत भव्य-दिव्य मिरवणूक काढण्यात येऊन सायंकाळी ६ ते ७ वेळेत सत्कार समारंभ संपन्न होणार आहे.तसेच ७ ते ९ दरम्यान जमलेल्या भाविक-भक्तांसाठी भोजन ठेवण्यात आले आहे.तसेच रात्री ९ ते ११ या वेळेत ह.भ.प.अमृत महाराज जोशी नवगण राजुरी यांच्या किर्तनाचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे.

# परशुराम जन्मोत्सवानिमित्त पालखी सोहळा उत्साहात

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

अंबाजोगाईत ब्राम्हण ऐक्य परिषद, पेशवा युवती व महिला संघटनच्या वतीने परशुराम जन्मोत्सव निमित्तच्या पालखी सोहळा उत्साहात संपन्न झाला.



शहराच्या देशपांडे गल्लीतील रणझुंजार बाजीप्रभु देशपांडे चौकातून सुरुवात झाली. याप्रसंगी शहरातील प्रतिष्ठित मान्यवर,पेशवा संघटनेचे पदाधिकारी,पत्रकार आदी उपस्थित होते.महाआरती नंतर निघालेली पालखी रामकृपा वसाहत, केशवनगर,दिनदयाळ वसाहत, चौसाळकर वसाहत,आदर्श वसाहत मार्गे कपिल गणेश मंदीर येथे पोहंचली तेथे महाआरती पसायदान गायनाने पालखी सोहळ्याची सांगता करण्यात आली. या पालखी सोहळ्यात असंख्य महिला,युवती,कार्यकर्ते, नागरीक सहभागी झाले होते.

**भगव्या टोप्यांचे आकर्षण**

भगवान परशुराम यांची मुर्ती असलेली पालखी शहरातून काढण्यात आली आणि भगव्या टोप्या घातलेले युवक आकर्षण ठरले.

# निगमानंद बाबा जन्मोत्सव सोहळा निमित्त नांदेवाली येथे आंखड हारीनाम सप्ताह सुरू

**शिरूरकासार । प्रतिनिधी**

नांदेवाली येथे स्वामी निगमानंद महाराज ( मच्छिंद्रगड) यांच्या जन्मभूमी आसलेल्या नांदेवाली येथे जन्मोत्सवानिमित्त वार्षिक अखंड हरिनाम सप्ताह ज्ञानेश्वरी पारायण सोहळा महंत स्वामी जनार्दन महाराज मच्छिंद्रगडकर यांच्या अध्यक्षतेखाली भव्य दिव्य स्वरूपात संपन्न होत आहे

त्यानिमित्त धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे त्यामध्ये काकडा भजन, ग्राम प्रदक्षिणा, ज्ञानेश्वरी पारायण, तुकाराम महाराज गाथा भजन ,भावार्थ रामायण, गीत रामायण, ज्ञानेश्वरी प्रवचन ,हरिपाठ, हरिकीर्तन, हारीजागर संपन्न होत आहे .संगीत रामायण प्रसिद्ध रामायणाचार्य लक्ष्मण महाराज शिरपे यांचे व भावार्थ रामायणाचे आयोजन करण्यात आले आहे या सप्ताहात प्रवचनकार सुरेश महाराज थिटे, शिवाजीदादा शेळके ,अण्णासाहेब महाराज थिटे, अर्जुन थिटे सर , सुदाम महाराज थिटे ,तीर्थराज महाराज पठाडे, दादासाहेब महाराज थिटे, यांचे प्रवचन होत आहे तर कीर्तनकार ह.भ.प बाबा गिरी महाराज नाकलवाडी, पांडुरंग महाराज गिरी, शिवानंद महाराज शास्त्री ,उद्धव महाराज शास्त्री, ज्ञानेश्वर महाराज तांबे नेवासा, महेश महाराज मडके, रामेश्वर महाराज शास्त्री यांचे कीर्तन संपन्न होत आहे शुक्रवार १७ मे रोजी महंत स्वामी जनार्दन महाराज श्रीक्षेत्र संस्थान मच्छिंद्रगड यांचे अमृतुल्य काल्याचे कीर्तन होणार आहे नंतर महाप्रसादाने सांगता होईल. महाप्रसादाचे आयोजन रमेश रामराव थिटे ,सुदर्शन शामराव थिटे, यांनी केले आहे या कार्यक्रमाचे भरदार सूत्रसंचालन दादासाहेब महाराज थिटे हे करत आहेत या सप्ताहाचा ला भाविक भक्ताने घ्यावा अशी आव्हान नांदेवाली ता.शिरूर कासार ग्रामस्थांनी केली आहे.स सप्ताहात नामांकित गायनाचार्य , मृदंगाचार्य, हार्मोनियम वादक उपस्थित राहात आहेत.नांदेवाली गावाला या स्वामी निगमानंद महाराज मच्छिंद्रगड यांच्या जन्मोत्सव सोहोळ्या ने पंढरपूर आवतारले आहे.

# माता न तू वैरिणी.. पोटच्या दोन चिमुकल्यांचा जीव घेऊन आईचा आत्महत्येचा प्रयत्न

## अंबाजोगाई तालुक्यातील खळबळजनक घटना

अंबाजोगाई । प्रतिनिधी

स्वयंपाक जास्त का केलास असे सासूने विचारल्याचा राग आल्याने विवाहितेने स्वतःच्या दोन्ही लेकरांना विषारी औषध पाजवून त्यांचा जीव घेत नंतर स्वतःही विषारी औषध प्राशन करून आत्महत्येचा प्रयत्न केल्याची खळबळजनक घटना अंबाजोगाई तालुक्यातील बर्दापूर येथे शुक्रवारी (दि.१०) रात्री घडली.

कौशल्या भीमराव दोडतले (वय २३, रा. टेकडी गल्ली, बर्दापूर) असे त्या विवाहितेचे नाव आहे. शुक्रवारी रात्री तिचा पती भीमराव हा धनंजय मुंडे यांच्या सभेला गेला होता. यावेळी घरात असलेल्या सासूने स्वयंपाक जास्त का केलास असे कौशल्याला विचारले. त्यामुळे रागात आलेली कौशल्या मुलगा कार्तिक (वय २) आणि मुलगी प्रांजल (वय ३) यांना घेऊन स्वतःच्या खोलीत गेली. तिथे तिने दोन्ही मुलांना विषारी औषध पाजविले. सभा संपून भीमराव घरी आल्यानंतर आईने त्याला कौशल्या रुसून खोलीत बसल्याचे सांगितले. त्यानंतर भीमराव खोलीत गेला असता त्यास मुलांच्या नाकाला फेस आल्याचे दिसले. त्यावर मुलांच्या नाकाला व्हॅसलिन लावल्याचे कौशल्याने सांगितले. परंतु, मुलांच्या नाकातून रक्तही येत असल्याने आणि मुलांची काहीच हालचाल दिसत नसल्याने घाबरलेल्या भीमरावने मुलांना खांद्यावर घेत बाहेर आणले आणि आरडाओरडा करून गल्लीतील लोकांना बोलावले. यावेळी कौशल्याने वरच्या खोलीत जाऊन विषारी औषध प्राशन केले. भीमराव आणि इतरांनी तिघांनाही घेऊन लातूरच्या खाजगी रुग्णालयात दाखल केले. तिथे डॉक्टरांनी तपासून कार्तिक आणि प्रांजल यांना मयत घोषित केले. तर, कौशल्यावर उपचार असून तिची प्रकृती स्थिर आहे. याप्रकरणी भीमरावच्या फिर्यादीवरून पत्नी कौशल्यावर बर्दापूर पोलीस ठाण्यात कलम ३०२ अन्वये बर्दापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपस पीएसआय ठाकूर करत आहे.

# चौसाळा बस स्थानकाच्या बांधकामाला स्थगिती द्यावी मागणी

**चौसाळा । प्रतिनिधी**

येथील नव्याने होणाऱ्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या चौसाळा बस स्थानकाला नव्याने बांधकाम व नूतनीकरण (दुरुस्ती) कामाला नुकतीच मंजुरी मिळाली असून सदर बस स्थानकाचे काम लवकरच सुरू होणार आहे सदर हे बांधकाम केवळ गुत्तेदाराच्या फायद्याने व त्याच्या मर्जीतून सुरू सुरू केले जात आहे सदर काम थातूरमातूर पद्धतीने केले जाणार आहे तरी सदर बांधकामाला महाराष्ट्र राज्य परिमंडळाने परवानगी न देऊन या कामाला स्थगिती द्यावी अशी मागणी चौसाळा ग्रामस्थांच्या वतीने परिवहन मंत्री यांच्याकडे करण्यात आली आहे चौसाळा बस स्थानकाचे नव्याने बांधकाम व नूतनीकरण करण्यासाठी शासनाकडून जवळपास पावणेतीन कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहे असल्याचे कळते दरम्यान सदर बांधकाम करणारे समंधित गुतेदार हे थातूर मातुर पद्धतीने काम करण्याचा त्यांचा



घाट आहे चौसाळा बस स्थानकात प्रवाष्याच्या वाढत्या संखे नुसार जागा अपुरी आहे तर सदर बस स्थानकामधील कॅन्टींग च्या अपुऱ्या जागेतच थाटणार आहेत तर स्वच्छता ग्रहाचे नव्याने बांधकाम न करता केवळ रंग रंगोटी करूनच गुत्तेदाराचा बिल उचलण्याचा घाट आहे तरी अधिकाऱ्याने या बांधकामाला तातडीने स्थगिती देऊन व नव्याने बांधकामचा आराखडा काढून चौसाळा बस स्थानकाचे योग्य पद्धतीने बांधकाम करावे अशी पद्धतीने अशी मागणी चौसाळ्याचे जेष्ठ कार्यकर्ते तथा बाबुशेठ लोढा यांच्यासह उपसरपंच अंकुशराव कळासे म पत्रकार एनटी वाघमारे विकास सर्वज्ञ यांच्या सह इतर मान्यवराने एका निवेदनाद्वारे मुख्यमंत्री एकनाथराव शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री अजित पवार पालकमंत्री धनंजय मुंडे तसेच विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन यांच्यासह मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

# वाढत्या उन्हाच्या तापमानामुळे आरोग्य धोक्यात येऊ शकते

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

साधारणपणे मे महिन्यात तापमान मोठ्या प्रमाणावर वाढलेले असते.या काळात अनेकदा उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागतो. यंदा मात्र तापमानात खुपच वाढ झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे उष्णतेची लाट व त्याच्या परिणामांपासून करावयाचा बचाव याबाबत माहिती घेणे आवश्यक आहे वातावरणातील बदलांमुळे सध्या पृथ्वीचे तापमान वाढते आहे. भारताच्या उत्तर भागात दरवर्षी उष्णतेच्या पाच ते सहा लाटा येतात. आणि हे प्रमाण वाढत असते या सोबतच पक्षी, प्राणी, वनस्पती यांची हानीही मोठ्या प्रमाणावर होत असते. त्यामुळे उष्णतेची लाट ही एक मुक आपत्ती मानली जाते. त्यामुळे होणारे नुकसानही मोठे असते. वातावरणाचे तापमान ४०अंश सेल्सियस असेपर्यंत मानवाला काही त्रास होत नाही. त्यानंतर मात्र मानवी शरीर वातावरणातील उष्मा शोषून घेऊ लागते. त्याचे विपरित परिणाम मानवी शरीरावर होतात. म्हणजे व्यक्तिला वाढते तापमान त्रासदायक ठरते. यांची काळजी प्राधान्याने घ्यावी

उष्णतेच्या लाटेचा धोका ज्या व्यक्तिंना आहे त्या व्यक्तिंमध्ये उन्हात बाहेर कष्टाची कामे करणारे लोक, वृद्ध व्यक्ती, लहान



बालके, मुले, स्थूल व्यक्ति, अयोग्य परिधान केलेले लोक, पुरेशी झोप न झालेल्या व्यक्ति, गरोदर महिला, अनियंत्रित मधुमेह, हृदयरोग, अपस्मार रुग्ण, दारुचे व्यसन असणारे लोक, काही विशिष्ट औषधी घेत असलेले लोक, बेघर लोक इ. गटांतील लोकांचा समावेश होतो. या अतिजोखमीच्या गटातील लोकांनी आपली काळजी घेणे आवश्यक आहे, तसेच समाजातील इतर घटकांनीही या लोकांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे

सार्वजनिक सुविधा निर्मिती आवश्यक

उष्णतेमुळे होणारा शारिरीक त्रास किरकोळ ते गंभीर स्वरुपाचा असू शकतो. किरकोळ त्रासाच्या स्वरुपात शरिरावर उष्णतेमुळे रॅशेश उमटणे, हातापायाला गोळे येणे, चक्कर येणे अशा स्वरुपाचा त्रास असतो. गंभीर प्रकारात उष्माघात होतो. यात व्यक्तीचा मृत्यूही होऊ शकतो. उष्णता लाटेस प्रवण भागात खालील प्रमाणे सार्वजनिक सुविधांची निर्मिती करणे आवश्यक असते.सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे (उदा. बसस्थानके, रेल्वे स्थानके, बाजार, धार्मिक ठिकाणे, बँका, प्रेट्रोल पंप, मुख्य रस्ते इ.)सार्वजनिक उद्याने, धार्मिक ठिकाणे, धर्मशाळा दिवसभर लोकांसाठी खुल्या ठेवणे. छतांना उष्णता विरोधी रंग लावणे. कार्यालये, शाळा, महाविद्यालये यांच्या कामकाजाच्या वेळा बदलविणे. उष्णतेपासून स्वतःचा बचाव कसा करावा याबाबत लोकांचे प्रबोधन करणे. उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी पुरेसे पाणी प्यावे. प्रवास करत असाल तर पाणी सोबत ठेवावे. हलक्या वजनाचे, फिकट रंगाचे, सैलसर कपडे वापरावेत. उन्हात गॉगल, छत्री, पादत्राणे वापरावे उन्हात जातांना टोपी ठेवावी पाळीव प्राण्यांना सावलीत, थंडाव्याच्या ठिकाणी ठेवावे. ओलसर पडदे, पंखा, कुलर यांच्या मदतीने घर थंड ठेवावे. हे करु नका -सार्वजनिक उद्याने, धार्मिक ठिकाणे, धर्मशाळा दिवसभर लोकांसाठी खुल्या ठेवणे.छतांना उष्णता विरोधी रंग लावावा.

कार्यालये, शाळा, महाविद्यालये यांच्या कामकाजाच्या वेळा बदलून ठेवाव्यात. उष्णतेपासून स्वतःचा बचाव कसा करावा याबाबत लोकांचे प्रबोधन करावे यासंदर्भात सामाजिक संस्थांनीही आपापल्या स्तरावर तसेच सर्व यंत्रणांनी मिळून सहयोगाने उपाययोजना कराव्या. नागरिकांपर्यंत सुचना पोहोचवून त्यांना सावध करणे ही आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने आपापल्या कुटुंबाची काळजी घ्यावी. असेही नमुद करण्यात आले आहे.

# पर्यावरण जनजागृती:दोन ठिकाणी ग्रीन मतदान केंद्र

**परळी । प्रतिनिधी**

बीडलोकसभा निवडणुकीत मतदारांना आकर्षित करण्यासाठी परळी मतदारसंघातील जिरेवाडी व कन्हेरवाडी येथीलमतदान केंद्रावर ग्रीन मतदान केंद्र एक विशेष मतदान केंद्र स्थापन करण्यात आले आहे.वन संवर्धन जनजागृती करण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात येत असल्याचे वन परिक्षेत्राचे मनोहर पुंड यांनी सांगितले.

बीड लोकसभा मतदार संघासाठी दि.१३ मे रोजी मतदान प्रक्रिया पार पडणार आहे यासाठी निवडणुक विभागाची तयारी पूर्ण झाली आहे. परळी विधानसभा मतदार संघात एकुण ३४२ मतदान केंद्र आहेत.यातील ८२ मतदान केंद्र हे परळी शहरात आहेत. मतदान केंद्रावर ३ लाख २६ हजार ३७४ मतदार मतदानाचा हक्क बजावणार आहेत. परळी विधानसभा मतदार




संघातीलजिरेवाडी व कन्हेरवाडी येथील मतदान केंद्र हे ग्रीन मतदान केंद्र असणार आहेत. वृक्षतोड करून भुमातेचे वस्त्र हिरवू नका,झाडावरती कुऱ्हाड चालू नका, वन्यजीवांचे संरक्षण हे आपले कर्तव्य आहे. असे संदेश देऊन या मतदान केंद्रावर वन संवर्धनासाठी जनजागृती करण्यात येत आहे.

वनविभागाकडूनअनोखे असे ग्रीन मतदान केंद्र प्रथमच उभारले आहेत. मतदारांनी मतदान करावे यासंदर्भात जागृतीही करण्यात येत असून मतदारांनी उत्स्फूर्तपणे मतदान करावे, असे आवाहन परळीच्या वनविभाच्या वतीने करण्यात आले आहे.

राज्य लोकतंत्र
# शेत-शिवार
सोमवार दि.१३ मे २०२४
४

# सरकारकडून हमीभावाने ज्वारी खरेदीला सुरुवात

पुणे : सध्याच्या घडीला बाजारात ज्वारीला हमीभावापेक्षा एक हजार रुपयांपर्यंत कमी दर मिळत आहे. ज्यामुळे गेल्या काही दिवसांपासून शासकीय खरेदीची मागणी केली जात होती. याच मागणीला प्रतिसाद देत आता राज्य सरकारच्या पणन महासंघामार्फत एक लाख ३६ हजार टन ज्वारीची तसेच १०० टन रागीची हमीभावाने सरकारी खरेदी केली जाणार आहे.

ज्वारी, रागी खरेदीसाठी निघालेल्या आदेशानंतर जिल्हास्तरावर आता मंजुरी घेत पणन विभागाकडून केंद्र सुरू करण्याची प्रक्रिया राबवली जाणार आहे. केंद्र सरकारने राज्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत पणन हंगाम २०२३-२४ मध्ये मका, ज्वारी व रागी हे भरडधान्य खरेदीच्या उद्दिष्टाला मंजुरी दिली आहे.

केंद्र सरकारने नेमून दिलेले ज्वारी व रागी खरेदीचे उद्दिष्ट महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ मर्या.मुंबई व महाराष्ट्र राज्य.सहकारी आदिवासी विकास महामंडळ मर्या. नाशिक या संस्थांना विभागून देण्यात आले आहे. ८ मेपासून ज्वारीची हमीभावाने खरेदी सुरू करण्यात आली असून, ३० जूनपर्यंत ती सुरू राहणार आहे. अशातच किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेअंतर्गत धान, मका, ज्वारी, रागी या सर्व पिकांच्या खरेदीसाठी ३१ मेपर्यंत मुदत वाढही देण्यात आली आहे. यासंदर्भात राज्य सरकारच्या अन्न व नागरी पुरवठा विभागाने आदेश काढले आहेत. राज्य सरकारच्या पणन महासंघ व आदिवासी विकास महामंडळाद्वारे ज्वारीची केवळ ऑनलाइन पोर्टलद्वारेच खरेदी केली जाणार आहे. ऑफलाइन खरेदी होणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे. ऑनलाइन नोंदणी करण्यासाठी ३१ मेपर्यंत मुदत देण्यात आली आहे. मुदतीमध्ये केंद्र सरकारने ठरवलेल्या दर्जानुसार खरेदी केली जाईल. असेही स्पष्टपणे नमूद करण्यात आले आहे.

### ३० जून पर्यंत करणार खरेदी



### बाजारात दर घसरण

दरम्यान, सध्या हायब्रीड ज्वारीला २०२२-२३ मध्ये २९७० रुपये हमीभाव होता. यंदा तो ३१८० रुपये करण्यात आला आहे. ज्वारी मालदांडीला २९९० रुपयांवरून यावर्षी ३२२५ रुपये हमीभाव जाहीर करण्यात आला. बाजार समितीमध्ये ज्वारीला सरासरी १८५० ते २३७० पर्यंत दर मिळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक फटका बसत आहे. हमीभावापेक्षा जवळपास एक हजार रुपये प्रति क्विंटलने कमी दर मिळत आहे.

# झेंडूच्या पुसा बहार जातीतून मिळते मोठे उत्पन्न



शेतकऱ्यांच्या सोयीसाठी राष्ट्रीय बियाणे महामंडळ पुसा बहारच्या सुधारित झेंडूच्या बियांची ऑनलाइन विक्री करत आहे. तुम्ही हे बियाणे ओएनडीसीच्या ऑनलाइन स्टोअरमधून खरेदी करू शकता.

गेल्या काही वर्षांपासून देशातील शेतकऱ्यांमध्ये फुलांची लागवड झपाट्याने होत आहे. झेंडूच्या फुलांना मोठी मागणी आहे. भारतीय फुलांमध्ये झेंडू खूप लोकप्रिय आहे. वर्षभर त्याची लागवड करता येते. झेंडूची वर्षभर सहज लागवड होते आणि त्याची मागणी वर्षभर बाजारात राहते. त्यामुळे झेंडूच्या लागवडीतून शेतकऱ्यांना कमी वेळात चांगले पैसे मिळू शकतात. धार्मिक आणि सामाजिक कार्यात मोठ्या प्रमाणावर वापरले जात असल्याने हे एक अतिशय महत्त्वाचे फूल आहे. या पिकाचा उपयोग किडे पकडण्यासाठीही केला जातो. पुसा बहार या झेंडूच्या संकरित जातीची लागवड फायदेशीर ठरते.

येथून झेंडूच्या बिया खरेदी करा : शेतकऱ्यांच्या सोयीसाठी राष्ट्रीय बियाणे महामंडळ पुसा बहारच्या सुधारित झेंडूच्या बियांची ऑनलाइन विक्री करत आहे. हे बियाणे ओएनडीसीच्या ऑनलाइन स्टोअरमधून खरेदी करू शकता. शेतकरी ते ऑनलाइन ऑर्डर करू शकतात आणि त्यांच्या घरी पोहोचवू शकतात.

झेंडूच्या बियांची खासियत : झेंडूच्या या फुलाची अनेक वैशिष्ट्ये आहेत. आफ्रिकन झेंडूची ही जात पेरणीनंतर ९०-१०० दिवसांत फुले देण्यास सुरुवात करते. त्याच्या झाडांची उंची ७५-८५ सेमी आहे. याशिवाय या फुलाचे वजन १५ ते १६ ग्रॅम असते. तसेच या जातीच्या फुलांचा दर्जाही खूप चांगला आहे. ही विविधता सजावटीसाठी सर्वोत्तम मानली जाते. ग्रामीण भागातील तरुणांसाठी जनऔषधी केंद्र बनत आहे करिअरचा सर्वोत्तम पर्याय, हमीशिवाय कर्ज घेऊन व्यवसाय सुरू करा झेंडूच्या बियांची किंमत जाणून घ्या : जर तुम्हाला झेंडूच्या सुधारित जातीची पुसा बहारची लागवड करायची असेल किंवा ती तुमच्या घरात लावायची असेल, तर राष्ट्रीय बियाणे महामंडळाच्या संकेतस्थळावर पुसा बहार जातीच्या १००० बिया ४३ टक्के सवलतीत २०७९ रुपयांमध्ये उपलब्ध असतील. हे खरेदी करून, झेंडूच्या फुलांची लागवड करून तुम्ही सहजपणे चांगला नफा मिळवू शकता.

अशा प्रकारे करा झेंडूसाठी शेती : झेंडू पिकासाठी जमीन तयार करताना एक खोल नांगरणी करून तीन-चार नांगरणी करावी. मग फील्ड लेव्हल करा. याशिवाय नांगरणी करताना १५-२० टन कुजलेले शेण किंवा कंपोस्ट जमिनीत मिसळावे म्हणजे उत्पादन चांगले मिळते. याशिवाय सहा पोती युरिया, १० पोती सिंगल सुपर फॉस्फेट आणि तीन पोती पोटॅश प्रति हेक्टरी शेतात मिसळावे. तसेच, प्रत्यारोपणाच्या ३० ते ४५ दिवसांनी झाडांभोवतीच्या ओळींमध्ये युरियाचा दुसरा आणि तिसरा डोस द्यावा.

# उत्तम पर्याय; मांस उत्पादनासाठी विशेष प्रसिद्ध!

राज्यातील भौगोलिक परिस्थितीचा विचार करता त्यात्या भागात हवामानानुसार तग धरून राहणाऱ्या शेळ्या विकसित झाल्या आहेत. बेरारी शेळीचा उगम महाराष्ट्रातील वर्धा, नागपूर या ठिकाणी झाला आहे. सध्याचा अमरावती विभाग हा 'बेरार प्रांत' म्हणून ओळखला जात असे. म्हणूनच या प्रांतात आढळणाऱ्या शेळ्यांना बेरारी असे नाव पडले आहे. सध्याच्या घडीला बेरारी प्रजातीच्या शेळीचा विस्तार विदर्भातील सर्वच ११ जिल्ह्यांमध्ये झाला आहे. नागपूर, वर्धा, अमरावती व अकोला जिल्ह्यांत या शेळयांची संख्या जास्त प्रमाणात आहे.

महाराष्ट्रात शेळीपालन प्रामुख्याने मांस उत्पादनासाठी केले जाते. यासोबतच दूध, लेंडीखत, चामडीसाठीही केले जाते. अशातच मध्यम बांध्याची ही बेरारी जातीची शेळी मांस उत्पादनासाठी विशेष प्रसिद्ध आहे. त्वचेचा रंग करडा असून, नाकपुड्या, खुरे इत्यादींचा रंग हा बहुतांशी काळा असतो. ही शेळी भक्कम बांध्याची असून, उंच असते. रंग काळा आणि शेपूट लांब असते. बेरारी शेळीला स्थानिक भागात लाखी किंवा गावरानी या नावाने सुद्धा ओळखले जाते.

या शेळीचे सरासरी वजन? : बेरारी शेळी ही उष्ण प्रदेशात चांगला तग धरून राहत असल्याने, तिला अग्निशिखा देखील म्हटले जाते. विदर्भातील ही शेळी प्रामुख्याने मटणासाठी वापरली जाते. पूर्ण वाढ झालेल्या बेरारी बोकडाचे सरासरी वजन ३६ किलो तर शेळीचे वजन ३० किलोपर्यंत असते. जन्मतः नर करडाचे वजन २.४६ किलो तर मादी करडाचे वजन २.३६ किलो असते. एका वर्षामध्ये या जातीच्या नराचे सरासरी वजन २३ किलो, तर मादीचे सरासरी वजन २० किलो असते.

बरारी शेळीचे वैशिष्ट्येः बेरारी शेळीचे कपाळ बहिर्वक्र आहे. नर व मादी शेळीला शिंगे असतात व त्यांची ठेवण वरून मागे झुकलेली असते. शेळ्यांचे कान लोंबणारे, पानाच्या आकाराची व चपटे असतात. शेळी प्रथम वयात येण्याचे वय हे ९ ते १० महिन्याचे असते. शेळीच्या दोन वेतांतील अंतर २४० दिवस, तर विल्यानंतर पुन्हा गाभण राहण्याचा काळ ९१ दिवसांचा असतो. शेळीचा गाभण काळ १४७ दिवस व माजाच्या चक्राचा कालावधी हा १७ दिवसांचा असतो. एकंदरीत प्रजनन क्षमतेचा विचार केला असता बेरारी शेळी लवकर वयात येते. दोन वर्षांत तीन वेळा विते. ही शेळी एका वेतामध्ये एक करडू देण्याचे प्रमाण ४१.५६ टक्के, जुळे देण्याचे प्रमाण ५६.४५ टक्के, तिळे देण्याचे प्रमाण १.८७ टक्के, तर चार पिले देण्याचे प्रमाण ०.१२ टक्के असते.



## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६४८ : दिल्लीतील लाल किल्ल्याचे काम पूर्ण झाले.
१८८० : थॉमस अल्वा एडिसनने मेन्लो पार्क, न्यू जर्सी येथे विजेवर चालणाऱ्या रेल्वेची चाचणी केली.
१९३९ : अमेरिकेतील पहिले व्यावसायिक एफएम रेडियो स्टेशन सुरु झाले.
१९५० : फॉर्म्युला वन वर्ल्ड चॅम्पियनशीपची पहिला रेस सिल्व्हरस्टोन येथे झाली.
१९५२ : भारतातील राज्यसभेचे पहिले अधिवेशन भरले.
१९६२ : डॉ.राधाकृष्णन भारताचे दुसरे राष्ट्रपती झाले.
१९६७ : डॉ. झाकीर हुसेन भारताचे ३रे पंतप्रधान बनले.
१९७० : नृत्यदिग्दर्शिका सितारादेवी यांनी मुंबई येथील बिर्ला मातोश्री सभागृहात सलग ११ तास ४५ मिनिटे नृत्य करण्याचा विश्वविक्रम प्रस्थापित केला.
१९९५ : ऑक्सिजन किंवा शेर्पा यांच्या मदतीशिवाय माउंट एव्हरेस्ट सर करणारी एलिसन हरग्रिव्हज ही पहिली महिला बनली.
१९९६ : ए. टी. पी. महिला जागतिक क्रमवारीत तब्बल ३३२ आठवडे अव्वल क्रमांकावर राहण्याचा विक्रम जर्मनीच्या स्टेफी ग्राफने केला.
१९९६ : लघुपट निर्माते अरुण खोपकर यांनी दिग्दर्शित केलेल्या सोच समझ के या कुटुंब नियोजनावरील लघुपटाला कुटुंबकल्याण या विषयावरील सर्वोत्तम चित्रपटाचा राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त झाला.
१९९८ : भारताने दोन परमाणु शास्त्रांची तपासणी पोखरण येथे केली.
२००० : उत्तर प्रदेश, बिहार व मध्यप्रदेश या राज्यांची फेररचना करुन अनुक्रमे उत्तराँचल, झारखंड व छत्तीसगढ ही राज्ये निर्माण करण्याच्या विधेयकांना केंद्रीय मंत्रीमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली.
२०००: भारताची प्रसिद्ध मॉडेल आणि मिस इंडिया लारा दत्ता हिने विश्वसुंदरी हा किताब पटकावला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८५७ : हिवतापाच्या जंतुंचा शोध लावल्याबद्दल नोबेल पारितोषिक मिळवणारे ब्रिटिश डॉक्टर सर रोनाल्ड रॉस यांचा जन्म. (मृत्यू: १६ सप्टेंबर १९३२ लंडन, यू. के.)
१९०५ : भारताचे ५वे राष्ट्रपती फक्रुद्दीन अली अहमद यांचा जन्म. (मृत्यू: ११ फेब्रुवारी १९७७)
१९१६ : सच्चीदानंद रौट्रे, भारतीय ओरिया भाषेतील कवी
१९१८ : भरतनाट्यम नर्तिका तंजोर बालसरस्वती यांचा जन्म. (मृत्यू: ९ फेब्रुवारी १९८४)
१९२५ : दलित साहित्याचे मर्मग्राही समीक्षक डॉ. भालचंद्र दिनकर फडके यांचा जन्म. (मृत्यू: १८ सप्टेंबर २००४)
१९५१ : आनंद मोडक, भारतीय संगीतकार और निर्देशक
१९५६ : आध्यात्मिक गुरू श्री श्री रविशंकर यांचा जन्म.
१९५६ : भारतीय जनता पार्टीचे राष्ट्रीय सरचिटणीस कैलाश विजयवर्गीय यांचा जन्म.
१९७३ : गीतलेखक, कवी संदीप खरे यांचा जन्म.
१९८४ : बेनी दयाल, भारतीय गायक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६२६ : अहमदनगरच्या निजामशाहीतील प्रसिद्ध दिवाण मलिक अंबर यांचे निधन.
१९०३ : फिलिपिन्सचे पहिले पंतप्रधान अपोलिनेरियो माबिनी यांचे निधन. (जन्म: २३ जुलै १८६४)
१९४७ : सुकांता भट्टाचार्य, भारतीय कवि और नाटककार
१९५० : प्राचीन भारतीय इतिहासाचे व संस्कतीचे अभ्यासक आणि पुरतत्त्वज्ञ देवदत्त रामकृष्ण भांडारकर यांचे निधन. (जन्म: १९ नोव्हेंबर १८७५)
१९९६ : भाऊराव ऊर्फ मधुकर दत्तात्रेय देवरस, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे ज्येष्ठ नेते.
२००१ : लेखक रासीपुरम कृष्णस्वामी नारायणस्वामी तथा आर. के. नारायण यांचे निधन. (जन्म: १० ऑक्टोबर १९०६)
२००६ : साली पद्मभूषण पुरस्कार सन्मानित प्रसिद्ध भारतीय वैद्यकीय डॉक्टर हेमलता गुप्ता यांचे निधन.
२०१० : कवी आणि बालकुमार-साहित्यिक विनायक महादेव तथा वि. म. कुलकर्णी यांचे निधन. (जन्म: ७ ऑक्टोबर १९१७ मणेराजूरी, सांगली)
२०११ : बंगाली चित्रपट क्षेत्रांतील संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय नाटककार आणि नाट्य दिग्दर्शक बादल सरकार यांचे निधन.
२०१३ : जगदीश माळी, भारतीय छायाचित्रकार
२०१६ : संत निरंकारी मिशनचे अध्यात्मिक गुरु बाबा हरदेव सिंह यांचे निधन.

# वांग्यांच्या अधिकच्या उत्पादनासाठी वापरा असे तंत्रज्ञान


वांगी ही सर्वसामान्य लोकांच्या आवडीची फळभाजी आहे. वांगे लागवडीपासून मोठा नफा कमविता येतो. यासाठी तंत्रशुध्द पध्दतीने वांग्याची लागवड करणे आवशयक असते. या पिकाला कोरडे आणि थंड हवामान चांगले मानवते. महाराष्ट्रातील हवामानात वांगी पिकाची लागवड तिनही हंगामात करता येवू शकते. खरीप हंगामासाठी बियांची पेरणी जूनच्या दुसऱ्या आठवड्यात आणि रोपांची लागवड जुलै - ऑगस्ट मध्ये केली जाते.

जमिन आणि मशागत : चांगला निचरा असलेली मध्यम काळी कसदार जमीन या पिकासाठी उत्तम समजली जाते. नदीकाठच्या गाळवट जमिनीत वांग्याचे भरपूर उत्पादन येते. रोप लागवडीपूर्वी जमिनीची नांगरट करुन चांगळी मशागत करावी व शेणखत मिसळावे व जमिनीच्या मगदुराप्रमाणे योग्य अंतरावर सऱ्या-वरंबे पाडावेत, हलक्या जमिनीत ७५ बाय ७५ सें.मी.तर जास्त वाढणाऱ्या किंवा संकरित जातीसाठी ९० बाय ९० सें.मी.अंतर ठेवावे. मध्यम किंवा काळ्या कसदार जमिनीत कमी वाढणाऱ्या जातींसाठी ९० बाय ७५ सें. मी. व जास्त वाढणाऱ्या जातींसाठी १०० बाय ५९० सें.मी.अंतर ठेवावे. कमी वाढणाऱ्या जातीसाठी हेक्टरी ४०० ते ५०० ग्रॅम बी पुरेसे होते. जास्त वाढणाऱ्या किंवा संकरित जातीसाठी हेक्टरी १२० ते १५० ग्रॅम बी पुरेसे होते.

खताची मात्रा : पेरणीपूर्वी बियाण्यास प्रती किलो ३ ग्रॅम थायरम चोळावे. मध्यम काळ्या जमिनीसाठी हेक्टरी १५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावे. संपूर्ण स्फूरद व पालाश व अर्धे नत्र लागवडीच्या वेळी द्यावे आणि उरलेले अर्धे नत्र लागवडीनंतर तीन समान हप्त्यात विभागून द्यावे. पहिला हप्ता लागवडीनंतर एक महिन्याने, दुसरा हप्ता त्यानंतर एक महिन्याने आणि तिसरा शेवटचा हप्ता लागवडीनंतर तीन ते साडेतीन महिन्यांनी द्यावा, खतांची मात्रा दिल्यानंतर लगेच पाणी द्यावे.

किडे व रोग : वांगी या पिकावर प्रामुख्याने तुडतुडे, मावा, पांढरीमाशी व कोळी या रस शोषणाऱ्या किडी आणि शेंडा व फळे पोखरणारी अळी या किडींचा प्रादुर्भाव होतो. तो रोखण्यासाठी इतर पिकांप्रमाणेच रोग नियंत्रण उपाय करावेत.

१) पीक लागवडीपूर्वी शेताची खोल नांगरट करावी. ज्या शेतात अगोदर टोमॅटो, मिरची, भेंडी, वेलवर्गीय भाज्या या पिकांची लागवड केळी असल्यास तेथे वांगी पिकाची लावगड करु नये. २) रोपासाठी तयार केलेल्या वाफ्यात कार्बोफ्युरॉन ३० ग्रॅम किंबा फोरेट १० ग्रॅम टाकावे. (१ बाय १ मी. वाफा) तसेचरोपांवार डायमेथोएट ३० टक्के प्रवाही १० मि.ली. किंवा मार्शळ १० मि.ली. १० लीटर पाण्यातून वापरावे. ३) रोपांची पुर्नलागवड करताना रोपे इमिडॅक्लोप्रीड १० मि.ली. १० लीटर पाण्यात मिसळून तयार केलेल्या द्राबणात तीन तास बुडवून ठेवाबीत व नंतर लावावीत. ४) लागवडीनंतर ४५ दिबसांनी तुडतुडे, माबा, पांढरी माशी या किडी आढळल्यास डायमेथोएट ३० टक्के प्रवाही, १० मि.ली. किंबा मिथिल डिमेटॉन २५ टक्के प्रवाही १० मि.ली. किंवा स्पार्क १० मि.ली. १० लीटर पाण्यातून फवारावे. ५) लागवडीनंतर दोन महिन्यांनी किडलेली शेंडे ब फळे आढळल्यास ती गोळा करुन नष्ट करावीत तसेच ४ टक्के निंबोळी अर्क किंबा सायपरमेथिन २५ टक्के प्रवाही ५ मि.ली. १० लीटर पाण्यातून फवारावे. ६) वांगी पिकावर कोळी आढळल्यास पाण्यात मिसळणारे गंधक ३० ग्रॅम किंवा डायकोफॉल २० मि.ली. १० लीटर पाण्यातून फवारावे.



# बीड शहरातील १७ रस्त्यांना आचारसंहिता संपताच नगरोत्थान योजनेतून मंजुरी देऊ

## उपमुख्यमंत्री अजित पवार यांची ग्वाही; डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मागणीची दखल

बीड । प्रतिनिधी

आम्ही नुसती गप्पा मारणारी माणसे नसून कामाचे आहोत. जनतेला दिलेले शब्द पाळणारी माणसे आहोत. बीडचे डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मागणीनुसार बीडमधील १७ रस्त्यांना लवकरच नगरोत्थान योजनेतून (टप्पा ३) मंजुरी देऊ, अशी ग्वाही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांनी दिली आहे. मारुतीच्या बीड लोकसभेच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या प्रचारार्थ शनिवारी (दि.११) कडा (ता.आष्टी) येथे अमोलक जैन विद्यालयात आयोजित सभेत छत्रपती उदयनराजे महाराज भोसले व ना.अजितदादा पवार हे एकाच मंचावर एकत्रित आले होते. यावेळी ते बोलत होते.



व्यासपीठावर उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्यासह पालकमंत्री धनंजय मुंडे, आमदार सुरेश धस, आमदार बाळासाहेब आजबे, माजी आमदार भीमराव धोंडे, परभणी लोकसभेचे उमेदवार महादेव जानकर, राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर, डॉ.शिवाजी राऊत, जि.प.च्या माजी अध्यक्षा सविता गोल्हार, रिपाइंचे युवा प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे आदी मान्यवर उपस्थित होते. पुढे बोलताना ना.अजितदादा पवार म्हणाले की, डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सांगितल्याप्रमाणे सोलापूर-धुळे (एन.एच.५२) महामार्गावर बीडजवळ उड्डाणपुलांसह स्लिप रोडला मान्यता देण्याची घोषणा रस्ते, वाहतूक व दळणवळण केंद्रीय मंत्री ना.नितीन गडकरी यांनी केली आहे. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या मागणीची दखल घेऊन हा शब्द ना.नितीन गडकरी यांनी दिला आहे. आता बीड शहरातील १७ रस्ते नगरोत्थान योजना टप्पा – ३ अंतर्गत करण्याची मागणी त्यांनी केली आहे. यासंदर्भात आपण पालकमंत्री धनंजय मुंडे, पंकजाताई मुंडे यांना सोबत घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे जाऊ. आमचा शब्द मुख्यमंत्री हे पाळतील. आचारसंहिता संपताच बीडमधील १७ रस्त्यांना नगरोत्थान योजनेतून मंजुरी देऊ, असा शब्द ना.अजितदादा पवार यांनी दिला आहे. दरम्यान, डॉ.योगेश क्षीरसागर यांनी दोन दिवसांपूर्वीच ना.नितीन गडकरी यांना निवेदन बीडजवळील उड्डाणपूल, स्लीप रोडचा प्रश्न मार्गी लावला. त्यापाठोपाठ आता बीड शहरातील अंतर्गत १७ रस्त्यांचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

चौकट

ना.अजितदादा पवार यांचा सत्कार

कडा येथे सभास्थळी येताच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार यांचा सत्कार राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केला. याप्रसंगी धनंजय मुंडे, पंकजाताई मुंडे, शुभम धूत यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

## शेतकऱ्यांसह अठरापगड जातीत बजरंग सोनवणेच –गणेश कवडे



पाटोदा । प्रतिनिधी

इंडिया विकास आघाडीचे बीड लोकसभेचे अधिकृत उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्या प्रचारार्थ शेतकरी नेते गणेश कवडे यांनी पाटोदा तालुक्यातील बऱ्याच शेतकऱ्यांसह १८ पगड जातीतील नागरिकात जाऊन कॉर्नर बैठका घेऊन त्यांना बजरंग पप्पांच्या विजयाचे साक्षीदार होण्यासाठी आव्हान केले आणि एकजुटीने १३ तारखेला मतदान करण्याचे आव्हान केले शेतकरी नेते गणेश कवडे यांच्या या गाव भेट दौऱ्याला नागरिकांनीही मोठा प्रतिसाद दिला आहे.

पाटोदा तालुक्यातील कॉर्नर बैठका घेऊन लोकशाही वाचवण्यासाठी, संविधान टिकवण्यासाठी,गुन्हेगारी क्षेत्रापासून परिवर्तन करण्यासाठी, शैक्षणिक दर्जा सुधारला पाहिजे सर्व जाती धर्मातील जन्माला आलेल्या उच्च शिक्षण घेऊन अधिकारी घडले पाहिजेत शेतकरी या दहा वर्षांमध्ये आर्थिक संकटाच्या खाईत लोटला गेला, जीएसटीने किती मोठा चटका लावला, अग्निपथ सारखी योजना आणून तरुण युवकांना सैनिक भरती पासून वंचित ठेवण्याचे काम हे सरकार करणार आहे.राज्यातील ५० ते ६० हजार शासकीय शाळा बंद करून गोरगरीब मजूर शेतकऱ्यांच्या मुलाला शिक्षणापासून वंचित ठेवण्याचा डाव या सरकारचा आहे,पेट्रोल, डिझेल, गॅस टाकी,खताची भाव वाढ याचा परिणाम शेतकऱ्यांच्या प्रपंचावर कसा झाला असे अनेक मुद्दे गणेश कवडे यांनी गाव,वाडी, वस्ती, तांड्यावर जाऊन हजारो शेतकऱ्यांच्या भेटी घेऊन त्यांना पटवून दिल्या सर्वसामान्य शेतकरी मजूर यांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद गणेश कवडे यांच्या कॉर्नर बैठकांना व भेटीगाठींना प्रतिसाद दिला.

## जातेगाव सर्कलमधून पंकजा मुंडेंना मोठी लीड मिळवून देणार–करण यमगर

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदार संघात विरोधकांकडून जाती पातीचे राजकारण करण्यात येत आहे.विरोधकांच्या भूलथापांना व आमिषाला बळी न पडता,भाजप व मित्र पक्षाच्या उमेदवार पंकजाताई मुंडे यांच्या पाठीशी जातेगाव सर्कलचे सर्व पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी मतांचा डोंगर उभा करुन, १३ मे रोजी मतदानरुपी साथ देवून बीड जिल्ह्याच्या विकासासाठी पंकजाताई मुंडेंच्या विजयावर शिक्का मोर्तब करण्यासाठी जातेगावमधून मोठी लिड मिळवून देणार असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे युवा नेते करण यमगर यांनी म्हटले आहे.




बीड लोकसभा मतदार संघात सध्या जाती पातीचे राजकारण मोठ्या प्रमाणात होत आहे. मात्र जनता जाती पातीच्या भुलथापांना बडी पडणार नसून जातेगाव सर्कमधून माजी आ. अमरसिंह पंडित व युवा नेते विजयसिंह पंडित यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात लिड मिळवून देणार आहे. तसेच जातेगाव सर्कमध्ये पंकजाताई यांना माणनारा मोठ्या वर्ग असून प्रत्येकाच्या तोंडून पंकजा मुंडे यांचेच नाव निघत आहे. जातीला थारा न देता विकासाला जातेगाव सर्कल मत देणार असल्याचेही यावेळी करण यमगर यांनी सांगितले. जातेगावसह गेवराई तालुक्यातील जनता अबकी बार पंकजाताईकी सरकार असे म्हणत असून १३ मे रोजी होणाऱ्या मतदानासही मोठ्या प्रमाणात मतदानासाठी उपस्थित असणार आहे.

## मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते अंकुश आतकरे यांचा सत्कार

गेवराई । प्रतिनिधी

पत्रकार अंकुश आतकरे यांना गेवराई तालुका उत्कृष्ट तालुकाध्यक्ष म्हणून राज्यस्तरीय पुरस्काराने गौरवण्यात आले होते. त्यामुळे त्यांचा मराठा क्रांती सूर्य म्हणून जरांगे पाटील यांच्या हस्ते दि.१२ मे रोजी ज्येष्ठ पत्रकार काजी अमान यांच्या निवासस्थानी सत्कार करण्यात आला.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई पत्रकार हल्ला विरोधी कृती समिती आयोजित राज्यस्तरीय अधिवेशन २०२४ हे पिंपरी चिंचवड येथे पार पडले होते. यावेळी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पत्रकारांचा गौरव करण्यात आला होता. यामध्ये गेवराई तालुका उत्कृष्ट अध्यक्ष म्हणून अंकुश आतकरे यांना राज्यस्तरीय पुरस्कार खा. अमोल कोल्हे, आ. बच्चू कडू, पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे, महासंघाचे सचिव विश्वासराव आरोटे, मराठवाडा विभागीय अध्यक्ष वैभव स्वामी, निरंजन टकले, महेश म्हात्रे, संजय आवटे, मंदार खणसे, सम्राट फडवणीस, आशिष जाधव आदी मान्यवरांच्या उपस्थित दिला होता त्या अनुषंगाने दि. १२ मे रोजी ज्येष्ठ पत्रकार काझी अमान यांच्या निवासस्थानी मराठा क्रांती सूर्य मनोज जरांगे पाटील यांच्या हस्ते पत्रकार अंकुश आतकरे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार बांधवासह विविध मान्यवर उपस्थित होते.

## पंकजा मुंडेंचया विजयासाठी गोपीनाथ मुंडेचे सहकारी मित्र प्रचारात

बीड । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदारसंघात पंकजाताई गोपीनाथ मुंडे यांना विजयी करण्यासाठी स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या काळात एकेकाळी सहकारी असलेले शिक्षण क्षेत्रातील प्राध्यापक सतीश पत्की, विजयराव पालशिंगणकर, नितीनचंद्र कोटेच्या यांच्यासह अनेकांनी बीड शहर अक्षरशः पिंजून काढले. सतीश पत्की यांनी पुढाकार घेत शहरातील विविध शिक्षण संस्थेच्या शिक्षक प्राध्यापकांच्या सोबत संवाद साधला.

विशेष म्हणजे अनेक वर्ष गोपीनाथ मुंडे यांच्या खांद्याला खांदा लावत सतीशराव पतकी, विजयराव पालसिंगनकर, नितीनचंद्र कोटेच या मंडळींनी काम केलेले आहे. त्यामुळे बीड शहरातील विविध क्षेत्रात मान्यवर लोकांच्या सोबत थेट त्यांचे संबंध आहेत. आशा सर्व क्षेत्रातील व्यक्तींचा जनसंपर्क या मंडळींना मागच्या आठ दिवसात केला आहे.

पंकजाताई मुंडे यांना विकासाची जाण असून बीड जिल्ह्याच्या भाग्यासाठी त्यांना प्रचंड मतांना निवडून द्यायला हवं, देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा नेतृत्व करणार आहेत आणि त्यांच्यासोबत पंकजाताई सारखा नेता आपण खासदार म्हणून जर पाठवला तर खऱ्या अर्थाने बीड जिल्ह्याचे भाग्य उजळल्याशिवाय राहणार नाही, या शब्दात विजयराव पालशिंगणकर, सतीशराव पत्की यांनी प्रतिक्रिया देताना आपल्या भावना व्यक्त केल्या.

## बीडला नवीन नाट्यगृह उभारणार; बजरंग सोनवणे यांचे डॉ. साळुंके यांना आश्वासन

बीड । प्रतिनिधी

हौशी रंगभूमीवर काम करणाऱ्या नाट्यसंस्थांना बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहाचे भाडे परवडत नाही या नाट्यगृहाची अत्यंत दुरावस्था झाली आहे हे मला माहित आहे त्यामुळे बीड शहरात एक नवीन छोटेखानी नाट्यगृह उभारून बीड जिल्ह्यातील नाट्यसंस्थांना ते माफक दरात उपलब्ध करून देऊन नाट्य चळवळीला गती देऊ असे आश्वासन शरद पवार राष्ट्रवादी काँग्रेसचे लोकसभेचे उमेदवार बजरंग सोनवणे यांनी डॉ. सतीश साळुंके यांना दिले. उमेदवार सोनवणे यांनी जेष्ठ रंगकर्मी नाटककार डॉ सतीश साळुंके यांच्या निवासस्थानी भेट देऊन जिल्ह्यातील नाट्य व साहित्य चळवळीवर चर्चा केली. त्यावेळी डॉ. साळुंके यांनी बीड शहरात नवीन नाट्यगृहाची मागणी मांडली.

यावेळी बजरंग सोनवणे यांच्यासह लोकप्रिय तरुण आ. संदीप क्षीरसागर आणि माजी आ. सय्यद सलीम उपस्थित होते. डॉ सतीश साळुंके यांनी सर्वांचे शाल,श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. यावेळी बोलताना साळुंके म्हणाले की, बीडचे नाट्यगृह हे केवळ सय्यद सलीम यांच्याच मुळे उभा राहिले आहे. परंतु आज मात्र हे नाट्यगृह जिल्ह्यातील कलावंतांच्या कोणत्याही कामाला येत नाही. नगरपालिकेच्या दुर्लक्षपणामुळे या नाट्यगृहाची अवस्था अत्यंत दुरावस्था झाली आहे. खुर्च्या तुटलेल्या आहेत, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही. अग्निशमन व्यवस्था नाही. यास अनेक विविध समस्यांनी हे नाट्यगृह ग्रासले असून ते आता कुचकामी ठरले आहे. तर आपण स्वतः पदरचे पैसे खर्च करून नाट्यगृहाचा पडदा व्यवस्थित केला असल्याचेही डॉ .साळुंके यांनी या वेळी ही बाब आ. क्षीरसागर, स. सलीम व उमेदवार सोनवणे यांच्या निदर्शनास आणून दिली. त्यावेळेस बजरंग सोनवणे यांनी वरील आश्वासन डॉ सतीश साळुंके यांना दिले. या प्रसंगी बीड शहरातील अनेक कलावंत उपस्थित होते.

## वाढत्या उन्हाच्या तापमानामुळे आरोग्य धोक्यात येऊ शकते

अंबाजोगाई । प्रतिनिधी

साधारणपणे मे महिन्यात तापमान मोठ्या प्रमाणावर वाढलेले असते.या काळात अनेकदा उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागतो. यंदा मात्र तापमानात खुपच वाढ झाल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे उष्णतेची लाट व त्याच्या परिणामांपासून करावयाचा बचाव याबाबत माहिती घेणे आवश्यक आहे वातावरणातील बदलांमुळे सध्या पृथ्वीचे तापमान वाढते आहे. भारताच्या उत्तर भागात दरवर्षी उष्णतेच्या पाच ते सहा लाटा येतात. आणि हे प्रमाण वाढत असते या सोबतच पक्षी, प्राणी, वनस्पती यांची हानीही मोठ्या प्रमाणावर होत असते. त्यामुळे उष्णतेची लाट ही एक मुक आपत्ती मानली जाते. त्यामुळे होणारे नुकसानही मोठे असते.

वातावरणाचे तापमान ४०अंश सेल्सियस असेपर्यंत मानवाला काही त्रास होत नाही. त्यानंतर मात्र मानवी शरीर वातावरणातील उष्मा शोषून घेऊ लागते. त्याचे विपरित परिणाम मानवी शरीरावर होतात.

म्हणजे व्यक्तिला वाढते तापमान त्रासदायक ठरते. यांची काळजी प्राधान्याने घ्यावी उष्णतेच्या लाटेचा धोका ज्या व्यक्तिंना आहे त्या व्यक्तिंमध्ये उन्हात बाहेर कष्टाची कामे करणारे लोक, वृद्ध व्यक्ती, लहान बालके, मुले, स्थूल व्यक्ति, अयोग्य परिधान केलेले लोक, पुरेशी झोप न झालेल्या व्यक्ति, गरोदर महिला, अनियंत्रित मधुमेह, हृदयरोग, अपस्मार रुग्ण, दारुचे व्यसन असणारे लोक, काही विशिष्ट औषधी घेत असलेले लोक, बेघर लोक इ. गटांतील लोकांचा समावेश होतो. या अतिजोखमीच्या गटातील लोकांनी आपली काळजी घेणे आवश्यक आहे, तसेच समाजातील इतर घटकांनीही या लोकांची विशेष काळजी घेणे आवश्यक आहे.

सार्वजनिक सुविधा निर्मिती आवश्यक उष्णतेमुळे होणारा शारिरीक त्रास किरकोळ ते गंभीर स्वरुपाचा असू शकतो. किरकोळ त्रासाच्या स्वरुपात शरिरावर उष्णतेमुळे रॅशेश उमटणे, हातापायाला गोळे येणे, चक्कर येणे अशा स्वरुपाचा त्रास असतो. गंभीर प्रकारात उष्माघात होतो. यात व्यक्तीचा मृत्यूही होऊ शकतो.

उष्णता लाटेस प्रवण भागात खालील प्रमाणे सार्वजनिक सुविधांची निर्मिती करणे आवश्यक असते.सार्वजनिक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे (उदा. बसस्थानके, रेल्वे स्थानके, बाजार, धार्मिक ठिकाणे, बँका, प्रेट्रोल पंप, मुख्य रस्ते इ.)सार्वजनिक उद्याने, धार्मिक ठिकाणे, धर्मशाळा दिवसभर लोकांसाठी खुल्या ठेवणे. छतांना उष्णता विरोधी रंग लावणे. कार्यालये, शाळा, महाविद्यालये यांच्या कामकाजाच्या वेळा बदलविणे. उष्णतेपासून स्वतःचा बचाव कसा करावा याबाबत लोकांचे प्रबोधन करणे. उष्णतेच्या लाटेपासून बचाव करण्यासाठी पुरेसे पाणी प्यावे. प्रवास करत असाल तर पाणी सोबत ठेवावे. हलक्या वजनाचे, फिकट रंगाचे, सैलसर कपडे वापरावेत. उन्हात गॉगल, छत्री, पादत्राणे वापरावे उन्हात जातांना टोपी ठेवावी पाळीव प्राण्यांना सावलीत, थंडाव्याच्या ठिकाणी ठेवावे. ओलसर पडदे, पंखा, कुलर यांच्या मदतीने घर थंड ठेवावे.हे करु नका –सार्वजनिक उद्याने, धार्मिक ठिकाणे, धर्मशाळा दिवसभर लोकांसाठी खुल्या ठेवणे. छतांना उष्णता विरोधी रंग लावावा कार्यालये, शाळा, महाविद्यालये यांच्या कामकाजाच्या वेळा बदलून ठेवाव्यात.

उष्णतेपासून स्वतःचा बचाव कसा करावा याबाबत लोकांचे प्रबोधन करावे यासंदर्भात सामाजिक संस्थांनीही आपापल्या स्तरावर तसेच सर्व यंत्रणांनी मिळून सहयोगाने उपाययोजना कराव्या. नागरिकांपर्यंत सुचना पोहोचवून त्यांना सावध करणे ही आवश्यक आहे. प्रत्येक नागरिकाने आपापल्या कुटुंबाची काळजी घ्यावी. असेही नमुद करण्यात आले आहे.

## अंबाजोगाई शहरात कोन बनेगा समर चॅम्पसचे बहारदार आयोजन

### न्यू व्हिजन पब्लिक स्कुलच्या वतीने ३ मे ते १० मे दरम्यान समर कॅम्प–२०२४

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे न्यू व्हिजन पब्लिक स्कुल व टॉडलर्स व्हिले प्रि स्कुलच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षी देखील व्हिजन समर कॅम्प–२०२४ संपन्न झाला. या कॅम्पमध्ये अंबाजोगाई शहर व परिसरातील विद्यार्थ्यां मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते. या समर कॅम्पच्या शेवटी अंबाजोगाई शहराच्या इतिहासात प्रथमच असा ''कोन बनेगा समर चॅम्पस–२०२४'' चे बहारदार आयोजन करण्यात आले होते. मागील वर्षी देखील व्हिजन समर कॅम्प या उपक्रमाला विद्यार्थी व पालकांनी उत्स्फूर्त असा प्रतिसाद दिला होता. यावर्षीच्या व्हिजन समर कॅम्पच्या सांगता समारोपाच्या कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन तथा माता सरस्वती पूजनाने करण्यात आली. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, संस्थेचे मार्गदर्शक वसंतराव चव्हाण , प्रा.डी.एच.थोरात, प्राचार्य रेंजो आर चंद्रन,ॲड. संतोष पवार , डॉ मनीषा पवार, धनराज सोळंकी , बजाज,रेड्डी या उपस्थित होत्या.



दिनांक ३ मे ते १० मे दरम्यान व्हिजन समर कॅम्पचे आयोजन करण्यात आले होते. व्हिजन समर कॅम्प मध्ये वय वर्ष ३ ते १४ या वयोगटातील मुले सहभागी झाली होती . या कॅम्प मध्ये सहभागी विद्यार्थ्यांना विविध कौशल्याची ओळख करून देण्यात आली ज्यामध्ये पक्षीनिरीक्षण , कुंभारकाम , घोडेस्वारी, निंजा वारीयर , मडी मार्वल , मैदानी खेळ , मनोरंजक नृत्य,आपत्कालीन परिस्थितीतील अवधान , श्लोक पठण , कागदी टोप्या बनवणे , गुड टच बॅड टच , चटपटा चॅट सारखे विविध उपक्रमविद्यार्थ्यांना शिकवण्यात आले. यावर्षीच्या व्हिजन समर कॅम्पचे विशेष आकर्षण म्हणजे कार्यकारी संचालक संकेत मोदी यांच्या संकल्पनेतील एक आगळा वेगळा उपक्रम मुलांच्या बुद्धीला चालना देणारा , आनंद देणारा , आणि रोख रकमेच्या बक्षीसांची लयलूट करणारा ,विद्यार्थ्यांच्या अंगी आत्मविश्वास मिळवून देणारा अंबाजोगाईच्या इतिहासातील पहिलाच रिॲलिटी गेम शो '' कोन बनेगा समर चॅम्प,– २०२४''' पार पडला . ही स्पर्धा वयोगट ७ ते ९ व १० ते १४ अशा दोन गटात घेण्यात आली. विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडावी व त्यांच्या बुद्धिमत्तेला चालना मिळावी या उद्देशाने देशातील शैक्षणिक , सांस्कृतिक , व्यवहारीक व ऐतिहासिक विषयावर बहुपर्यायी विविध प्रकारचे प्रश्न विद्यार्थ्यांना मोठ्या पडद्याद्वारे विचारण्यात आले. या स्पर्धेत दोन्ही गटातील एकून १२ संघांनी आपले ज्ञान आणि गती दाखवून दिली. यातील ७ ते ९ या वयोगटातून प्रथम आलेल्या संघाला (अर्णव चौधरी व आरोही राऊत ) यांना ११००० / रुपयांचे रोख बक्षीस व १० ते १४ या वयोगटातून प्रथम आलेल्या संघातील (आर्या दायमा व क्रिशा इंदानी ) २१०००/ रुपयांचे रोख बक्षीस देण्यात आले . सदरील रोख रक्कम ही विजेत्यांना फिक्स डिपॉझिटच्या माध्यमातून विभागून देण्यात आली जेणेकरून सात वर्षानंतर त्यांना ही रक्कम नक्कीच वाढवून मिळेल आणि विद्यार्थ्यांना देखील आपोआप बचतीची सवय देखील लागेल. आयोजित या प्रश्नमंजुषा कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन न्यू व्हिजन पब्लिक स्कुलच्या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रमाच्या बहारदार सूत्र संचालकांनी प्रेक्षकांनाही या उपक्रमात सहभागी करून घेतले . प्रेक्षकांनीही प्रश्नांची उत्तरे देऊन बक्षीसे मिळवली. 'कौन बनेगा समर चॅम्प ' या रियालिटी शो साठी शाळेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली . या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन शिवेंद्रसिंह कणसे , हर्षल गजभार , दिव्या इंगळे, प्रिया कांदे , शिवानी तोडकर , ईश्वरी कराड यांनी तर आभार प्रदर्शन दतात्रय नेवल यांनी व्यक्त केले .आयोजित कॅम्पच्या सांगता समारोपाच्या कार्यक्रमास संस्थेचे संस्थापक राजकिशोर मोदी, कार्यकारी संचालक संकेत मोदी, व्ही. बी .चव्हाण, प्राचार्य बी. आय. खडकभावी, प्रा. सुरेश बिराजदार प्रा. विवेकानंद राजमाने ,प्राचार्य श्री रेंजू आर चंद्रन यांनी कार्यक्रमास शुभेच्छा दिल्या व मुलांचे कौतूक केले.


## जातीपातीच्या चष्म्यातुन पंकजाताईचं नेतृत्व बघु नका–राजेंद्र मस्कें

बीड । प्रतिनिधी

पंकजाताई मुंडे यांच्या विजयाकडे लोक आता अपेक्षेने बघत असुन जातीपातीच्या राजकारणाच्या भिंती अंतिम टप्यात गळुन पडल्या. त्यांना खासदार करणं आपल्या जिल्ह्याच्यासाठी काळाची गरज असुन पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रिय मंत्री नितीन गडकरींनी जिल्हा विकासाची जबाबदारी घेतली. दुरदृष्टीने समर्पक विचार करून सकारात्मक बघा. चुकीचा निर्णय घेवु नका. एवढेच नाही तर जातीपातीच्या चष्म्यातुन नेतृत्वाकडे न बघता त्यांचे पात्र सत्पात्री आहे, त्यात आपलं मतदान करून त्यांना दिल्लीला पाठवा असे आवाहन भाजपाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले.

निवडणुकीच्या अंतिम टप्यात बीड विधानसभा मतदारसंघात शहरासह ग्रामीण भागात मस्केंनी झंझावती दौरे करत ठिकठिकाणी गाव बैठका, कॉर्नर बैठका घेत मागच्या पंधरा दिवसात जोरदार संपर्क साधला. गावागावात बोलताना त्यांनी सांगितले की, लोकसभा निवडणुकीत पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नितीन गडकरी शिवाय काल छत्रपती उदयनराजे महाराज यांच्या जाहिर सभेनंतर संपुर्ण बीड जिल्ह्याचा मुड बदलुन गेला. प्रत्येकाला आपल्या जिल्हा विकासाची काळजी आणि भावी पिढीची काळजी असल्याने विकासाचा मुद्दा शेवटच्या टप्यात प्रभावी ठरला. बजरंग सोनवणे यांनी निवडणुकीला जातीपातीचा दिलेला रंग मतदारांना न पटल्याने तो फिका ठरला. ज्यामुळे अठरापगड जातीधर्माच्या लोकांना मतदान हे केवळ पंकजाताईलाच केलं पाहिजे. कारण हे नेतृत्व क्षमतावान असुन विरोधी उमेदवाराची त्यांच्यासोबत तुलनाच होवु शकत नाही. कर्तृत्व त्यांनी पालकमंत्री असताना सिद्ध केलं.

या जिल्ह्यात २५ हजार कोटी रूपयांची कामे त्या काळात झाली. गडकरींना एक पत्र पाठवलं तर १० हजार कोटी रूपये रस्ते विकासाला मंजुरी मिळाली. असे नेतृत्व बीड जिल्ह्यातुन दिल्लीला पाठवलं तर विकासाच्या दृष्टीने आपला जिल्हा देशाच्या प्रगत नकाशावर आल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे कुणी काहीही सांगत असेल तर अफवाला बळी न पडता पंकजाताई मुंडेंना प्रचंड मताने विजयी करावे असे आवाहन त्यांनी केले. एवढेच नव्हे तर त्यांचा विजय हा काळ्या दगडावरची पांढरी रेघ आहे. सुज्ञ मतदार बांधवांनी कोणत्याही भूलथापांवर विश्वास ठेवू नये .पंकजाताईच खासदार होणार आणि दिल्लीला जाणार हा विश्वास देखील त्यांनी बोलुन दाखविला.



# प्रचाराच्या शेवटच्या दिवशी ना. बनसोडे यांनी अंबाजोगाई शहरातील विविध प्रभागात लावला कॉर्नर बैठकांचा धडाका

## शहरातील मिलिंद नगर, क्रांती नगर, समता नगर परिसरात कॉर्नर बैठक घेऊन ना संजय बनसोडे यांनी नागरीकांना पंकजा मुंडे यांना मतदान करण्याचे केले आवाहन

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राज्यातील चौथ्या टप्प्यातील मतदान प्रचाराच्या तोफा शनिवारी संध्याकाळी थंडावल्या. संध्याकाळ पासून शहरात विविध ठिकाणी विविध नेत्यांकडून कॉर्नर बैठकांचे सत्र सुरू झाले . यामध्ये अंबाजोगाई शहरदेखील आघाडीवर दिसून आले. अंबाजोगाई शहरात राज्याचे कृषिमंत्री तथा पालकमंत्री धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांच्या प्रचारासाठी राज्याचे युवक कल्याण तथा बंदरे विकास मंत्री ना संजय बनसोडे यांच्या उपस्थितीत शहराचे माजी नगराध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या पुढाकाराने अंबाजोगाई शहरातील मिलिंद नगर, क्रांतीनंतर, त्याचबरोबर परळी वेस परिसरातील समता नगर येथे कॉर्नर बैठका आयोजित केलेल्या होत्या. या बैठकीस लातुर महानगर पालिकेचे माजी महापौर ॲड व्यंकटराव बेदरे, शहराचे माजी नगरसेवक महादेव आदमाणे, खालेद चाऊस, धम्मा सरवदे, संतोष शिनगारे, दिनेश भराडीया, राजू मोरे, रुपेश चव्हाण, काझी खयामोद्दीन, उज्जेन बनसोडे यांच्यासह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.





या कॉर्नर बैठकीत राजू मोरे, महादेव आदमाणे यांनी आपल्या भावना व्यक्त करतांना सांगितले की आपल्या भागात किंवा आपल्या शहरात राजकिशोर मोदी हेच आपले उमेदवार आहेत असे समजावे कारण आपल्या दैनंदिन जीवनातील आपण कुठल्याही कामासाठी राजकिशोर मोदी यांच्याच कडे जातोय. त्यामुळे मोदी ज्या उमेदवारास मतदान करावयास सांगतील केवळ त्याच उमेदवारास म्हणजेच पंकजा मुंडे यांनाच बहुमताने मतदान करून त्यांनाच विजयी करावे असे उपस्थित सर्व नागरिक मतदारांस सांगितले. लातूर महानगरपालिकेचे माजी महापौर ॲड व्यंकटराव बेदरे यांनीदेखील आपले मत मांडताना बीड जिल्ह्याचा नावलौकिक देशात वाढविण्यासाठी पंकजा मुंडे यांना भारी भरकम मतांनी निवडून आणण्यासाठी प्रयत्न करावा असे आवाहन बेदरे यांनी केले. शाहू, फुले, आंबेडकर यांच्या विचारांचा वसा पुढे नेण्यासाठी , तसेच चांगला समाज घडविण्यासाठी महायुतीच्या उमेदवार पंकजा मुंडे यांना प्रचंड मतांनी विजयी करण्याचे आवाहन देखील यावेळी ॲड व्यंकट बेदरे यांनी उपस्थित सर्व मतदारांना केले. आपल्या मार्गदर्शनात राजकिशोर मोदी यांनी बीड जिल्ह्याचे पालकमंत्री मा ना धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शन व नेतृत्वाखाली संपूर्ण बीड जिल्हा अतिशय उत्तम प्रकारे काम करताना दिसत आहे. त्यांच्याच पावलावर पाऊल टाकत पंकजा मुंडे देखील काम करत आहेत. त्यामुळे आपल्या भागाचा आणखीन चांगला विकास होण्यासाठी आपल्या माणसाला मतदानरुपी आशीर्वाद देण्याची विनंती राजकिशोर मोदी यांनी या बैठकीद्वारे सर्व मतदारांना केली.जिह्यात सुरु असलेल्या जातीपातीच्या घाणेरड्या राजकारणाला बळी न जाता आपल्या सद्सद्विवेक बुद्धीने मतदान करा व पंकजा मुंडे यांना बहुमतांनी विजयी करा असे आवाहन देखील राजकिशोर मोदी यांनी उपस्थित मतदारांना केले. या कॉर्नर बैठकीत राज्याचे युवक कल्याण व बंदरे विकास मंत्री ना संजय बनसोडे यांनी उपस्थित सर्व मतदार बंधू भगिनींना विस्तृत असे मार्गदर्शन केले.यावेळी त्यांनी तत्कालीन माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे यांनी सर्वधर्म समभाव सांभाळत सर्वांचा विकास केला.त्याच्याच आदर्शावर आताचे महायुतीचे सरकार काम करत असल्याचे संजय बनसोडे यांनी सांगितले. एका बौद्ध समाजाच्या सामान्य कार्यकर्त्याला उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आमदार करून मंत्रीपदी बसविले .यावरून या महायुतीच्या सरकारची विचारधारा स्पष्ट होत असल्याचे त्यांनी नमूद केले. स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे यांनी राज्य तथा देशासाठी केलेल्या योगदानाबद्दल त्यांना खऱ्या अर्थाने श्रद्धांजली द्यायची असेल तर ती त्यांच्या कन्या पंकजा मुंडे यांना मतदान करून व त्यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करूनच दिली गेली पाहिजे असे ठाम मत ना संजय बनसोडे यांनी या बैठकीतून केले. पुढे बोलताना ना संजय बनसोडे यांनी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या कार्यकर्तृत्वाचा देखील गौरव केला. त्यांच्याच काळात गरिबांना मोफत धान्य, मोफत शिक्षण , मोफत आरोग्य, शेतकऱ्यांसाठी विविध योजना राबविण्यात येत आहेत. त्यामुळे नरेंद्र मोदी हेच यापुढेही देशाला अत्युच्च शिखरावर पोचवू शकतात तेव्हा त्यांना तिसऱ्यांदा देशाचे पंतप्रधान त्याचबरोबर त्यांच्याच मंत्रिमंडळात देशाच्या मंत्री म्हणून काम करण्यासाठी त्यांना बहुमताने विजयी करण्याचे आवाहन याप्रसंगी संजय बनसोडे यांनी उपस्थित सर्व मतदार बंधू भगिनींना केले. याचबरोबर अंबाजोगाई शहरात राजकिशोर मोदी देखील मागील पंचवीस तीस वर्षापासून अंबाजोगाई करांची सेवा करत आहेत. शहराच्या विकासासाठी त्यांनी आतापर्यंत अनेक चांगल्या योजना शहरात राबविल्या आहेत. यापुढेही अशीच साथ तमाम शहरवासीयांनी राजकिशोर मोदी यांना द्यावी व त्यांचा पाठीमागे खंबीरपणे उभे राहून त्यांच्याच सोबत त्यांच्या खांद्याला खांदा लावून पंकजा मुंडे यांना उद्याच्या १३ तारखेला कमळाच्या चिन्हसमोरील बटन दाबून मतदान करण्याचे कळकळीचे आवाहन याप्रसंगी उपस्थित अंबाजोगाई वासीयांना केले. विविध प्रभागातील बैठकांना त्या त्या भागातील युवक , महिला, व जेष्ठ नागरिक मोठ्या प्रमाणावर सहभागी झाल्याचे दिसून येत होते. या बैठका यशस्वी करण्यासाठी जावेद गवळी, महेबूब गवळी, खलील जाफरी, मतीन जरगर, विश्वजित शिंदे, दीपक गुंजाळ, सचिन गालफाडे, राहुल वाघमारे, अमोल मिसाळ , धोंडीराम कांबळे, उमेश जोगदंड, बळीराम पाटोळे, कृष्णा पाटोळे, केशव जोगदंड, बालाजी जोगदंड, महेश वेडे आदींनी परिश्रम घेतले.

# जिल्ह्याच्या विकासासाठी बजरंग सोनवणे यांना प्रचंड मताधिक्याने निवडून आणा -परमेश्वर सातपुते

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात आम्ही भरपूर विकास केला अशा बेंबीच्या देठापासून पोकळ घोषणा करणाऱ्या भाजपच्या पाया खालची वाळू सरकली असून त्यांचा पराभव निश्चित आहे गेल्या वीस वर्षांपासून त्यांच्या कडेच सत्ता असूनही ते जिल्ह्याचा विकास करू शकले नाहीत ते आता काय विकास करणारबीड जिल्ह्यात विकासाचे काही सांगण्या सारखे नसल्यामुळे ह्या लोकसभा निवडणुकीत जातीयवाद होतोय अशी अवाई उठवून देत आहे



वास्तविक बीड जिल्हा विकासा पासून खूप दूर राहिला आहे रेल्वे चा अनेक वर्ष रखडलेला प्रश्न असो की ऊस तोड मजुराचा प्रश्न असो हा अजूनपर्यंत सोडविता आला नाही सत्तेसाठी भाजप कुठल्याही थराला जात असून साम, दाम, दंड, भेद, नीतीने निवडणुका जिंकण्यासाठी वागत आहे

राज्यात ही लोकशाही पदधतीने काम करत असलेले उध्दव साहेबांचे सरकार पडण्याचे पाप भाजपने केले मराठी अस्मितेचे पक्ष फोडून गद्दार सरकार स्थापन केले कोरोना काळात उध्दव साहेबांनी कुटुंब प्रमुख म्हणून राज्यातील जनतेचे जीव वाचवले, शेतकऱ्यांना विना अट दोन लाखा पर्यंत कर्जमाफी केली, त्यामुळे उद्या होणाऱ्या लोकसभा निवडणुकीत महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करावे असे आवाहन शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी केले आहे

# तुम्ही पंतप्रधानपदाचे उमेदवार आहेत का? स्मृती इराणींचा राहुल गांधींना सवाल

नवी दिल्ली । वृत्तसेवा

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी निवडणुकीच्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर जाहीर चर्चेचे निमंत्रण काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी स्वीकारले आहे. यावर केंद्रीय मंत्री स्मृती इराणी यांनी खिल्ली उडवली आहे. राहुल गांधी हे इंडिया आघाडीचे पंतप्रधानपदाचे उमेदवार आहेत का? असा सवाल करून ते पंतप्रधान मोदींसारख्या उंचीच्या व्यक्तीशी वाद घालू शकतात का?, अशी टीका केली आहे.





ज्या व्यक्तीच्या तथाकथित बालेकिल्ल्यात भाजपच्या सामान्य कार्यकर्त्याविरुद्ध निवडणूक लढवण्याची हिंमत नाही, त्याने बढाई मारू नये. पंतप्रधान मोदी यांच्यासोबत इंडिया आघाडीचे पंतप्रधानपदाचे उमेदवार असतील, त्यांनीच चर्चा करण्यासाठी पुढे यावे, असे इराणी यांनी म्हटले आहे.

केरळच्या वायनाड आणि उत्तर प्रदेशच्या रायबरेली मतदारसंघातून निवडणूक लढवत असलेल्या राहुल गांधींनी लोकसभा निवडणुकीवर पंतप्रधान मोदींसोबत सार्वजनिक चर्चेचे निमंत्रण औपचारिकपणे स्वीकारले आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश मदन बी लोकूर, उच्च न्यायालयाचे माजी मुख्य न्यायाधीश एपी शाह आणि ज्येष्ठ पत्रकार एन राम यांनी निमंत्रण दिले होते.

# जात-पात न पाहता पंकजाताईंना शिवसैनिकांनी रेकॉर्ड ब्रेक मतदान करावे -येवले, सोळंके

माजलगाव । प्रतिनिधी

होऊ घातलेल्या लोकसभा निवडणुकीमध्ये विरोधक जातीपातीचे राजकारण करत आहेत परंतु शिवसेनेमध्ये जातीपातीचे राजकारण केले जात नाही तर शिवसेना ही एक जात आहे म्हणून शिवसैनिकांनी जात पात न पाहता महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना रेकॉर्ड ब्रेक मताधिके देऊन विजयी करावे असे आव्हान शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले व शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके यांनी केले आहे.



बीड लोकसभा मतदारसंघात दिनांक १३ मे रोजी मतदान होत असून या निवडणुकीमध्ये महायुतीच्या उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे ह्या नेतृत्व कर्तुत्व आणि वक्तृत्व गुणसंपन्न अशा दमदार उमेदवार आहेत त्यांनी महाराष्ट्र राज्याचे मंत्रीपद सांभाळत असताना त्यांनी ग्रामीण भागात विकास काय असतो हे त्यांनी दाखवून दिलेले आहे आणि त्या आता लोकसभा निवडणुकीत महायुतीच्या उमेदवार म्हणून निवडणूक आखाड्यात आहेत परंतु त्यांची लोकप्रियता पाहता विरोधक जातीपातीचे राजकारण करत मतदारांना भूलथापा देत आहेत

शिवसेनेमध्ये जातीपातीचे राजकारण केले जात नाही तर शिवसेना हीच एक जात समजून काम केले जात आहे हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे धर्मवीर आनंद दिघे यांचे विचाराचे खरे वारसदार म्हणून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे खासदार श्रीकांत शिंदे हे काम करत आहेत म्हणून या लोकसभेच्या निवडणुकीमध्ये महायुतीचे उमेदवार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे यांना शिवसैनिकांनी रेकॉर्ड ब्रेक मताधिके देऊन प्रचंड मतांनी विजयी करावे असे आवाहन शिवसेना तालुकाप्रमुख तुकाराम येवले शहर प्रमुख धनंजय पापा सोळंके युवा सेनेचे तालुकाप्रमुख अभिजीत कोंबडे शिवसेनेच्या महिला आघाडीच्या उपजिल्हाप्रमुख शारदाताई डोईजड तालुकाप्रमुख कल्याणी ताई चव्हाण यांनी केले आहे

# नरेंद्र मोदी सरकार स्थापनेसाठी, पंकजाताईंनाच सढळ हाताने मतदान करा – राजेंद्र मस्के

बीड । प्रतिनिधी

सुज्ञ मतदार बंधू भगिनींनो कोणताही पक्ष अथवा नेता सरकार स्थापनेसाठी निवडणूक लढवत नाही, तर भाजपाला बहुमत मिळू नये, यांसाठीच निवडणूक लढवत आहेत. त्यांच्या डोक्यात राष्ट्रहिताचा कोणताही विचार नाही. केवळ नरेंद्र मोदींना अडवणे हा छुपा हेतु आहे. अशा कुटील राजकीय खेळीला बळी पडु नका. पुन्हा एकदा राष्ट्रहितासाठी कर्तृत्व सिद्ध मोदी सरकार स्थापनेसाठी ठाम निश्चयाने पंकजाताई मुंडे यांनाच प्रचंड मतांनी विजयी करावे. असे आवाहन भाजपा जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.





राज्यभर मराठा आरक्षणचा लढा चालू असताना बीड मध्ये जातीयतेचा चटका तीव्रतेने जाणवतोय.लोकसभा निवडणूक व मराठा आरक्षण लढा यांची आपसात त्वेषाने गफलत होत आहे. लोकशाही मध्ये कोणत्याही एका जातीयतेच्या प्रभावाने राजकारण करणे घातक असते. जातीयता बाजूला सारून व्यापक दृष्टिकोनातून निर्णय घ्यावा लागतो. मराठा समाजला १००% आरक्षण मिळालेच पाहिजे. हा आक्रोश सर्व मान्य असुन मी ठामपणे समर्थन करतो. आरक्षणाच्या न्याय लढाईत कायम समाजा बरोबर आहे, आणि पुढे ही राहणार आहे. मनोज जरांगे पाटील मराठा आरक्षणाचे हिरो तर विरोधी उमेदवार झीरो आहे. याचे भान ही असायला हवं आज आरक्षणाचा प्रश्न सोडविण्यासाठी राज्य सरकार सकारात्मक पाऊल उचललत आहे. लोकसभेची निवडणूक सर्व समावेशक

राष्ट्रीय ध्येय धोरण, विकास प्रगती हे मुद्दे डोळ्यासमोर ठेवून लढवली जाते. व्यापक दृष्टिकोन ठेवून मतदान करण्याची गरज असते.

जिल्ह्याचा बहुअंगी विकास झाला पाहिजे. यासाठी विचार करून मतदान करणे काळाची गरज आहे. मराठा आरक्षणाच्या आक्रोशातही समाजाला विकासाचा राजमार्ग शोधताना पंकजाताई मुंडेचा समर्थ पर्याय ठरतो. भावनेच्या आहारी न जाता जिल्ह्याला मिळालेली राजकीय संधी लक्षात घेऊन संयमाने निर्णय घेण्याची गरज आहे. जिल्ह्याचा विकास आणि सामाजिक सलोखा कायम ठेवत पंकजाताई मुंडे यांना सढळ हाताने मतदान करुन, विजयी करावे.

# जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणेंना विजयी करा

## खा. पाटील, पंडित, दरेकर, दराडे, सय्यद, होके पाटील, धांडे, नवले, साठे यांचे आवाहन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्याचा जिव्हाळ्याचा रेल्वेचा रखडलेला प्रश्न, प्रत्येक तालुक्यात उद्योगांची उभारणी करीत बेरोजगार तरुणांचे प्रश्न सोडविण्यासह जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व महाविकास आघाडीचे उमेदवार शेतकरी पुत्र बजरंग बप्पा सोनवणे यांना मतदानरुपी आशीर्वाद देऊन विजयी करावे असे आवाहन काँग्रेसच्या नेत्या खा. रजनीताई पाटील, माजी मंत्री बदामराव पंडित, माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी आमदार उषा दराडे, माजी आमदार सय्यद सलीम, माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, माजी आमदार सुनील धांडे, माजी आमदार सुरेश नवले, माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी केले आहे.

बीड जिल्ह्याच्या विद्यमान खासदार डॉ. प्रीतम मुंडे यांनी आपल्या दहा वर्षाच्या काळात विकास निधी खर्च न केल्याने निधी परत गेला. त्यामुळे जिल्ह्याच्या विकासाचा अनुशेष भरून न निघाल्याने आपला जिल्हा विकासाच्या दृष्टीने खूप मागे राहिला आहे. रेल्वेचा प्रश्न सुटला नसून अपूर्ण कामामुळे रेल्वे कधी धावणार असा प्रश्न निर्माण झाला आहे. जिल्ह्यात उद्योग धंदे न आणल्याने सुशिक्षित बेरोजगार तरुण हातात कोयते घेऊन पर राज्यासह बाहेर जिल्ह्यात स्थलांतरित होत आहेत. शेतीमालाला हमी भाव मिळत नसल्याने शेतकऱ्यांची दयनीय अवस्था झाली असून पीकविमा, अनुदान न मिळाल्याने शेतकरी चिंताग्रस्त आहेत. त्यामुळे येणाऱ्या काळात महायुतीच्या उमेदवारांकडून विकासाची अपेक्षा न ठेवता व त्यांच्या भूलथापांना बळी न पडता बीड जिल्ह्यातील रेल्वेचा प्रश्न येत्या पाच वर्षांच्या काळात मार्गी लावण्यासाठी, प्रत्येक तालुक्यात प्रत्येक तालुक्यात उद्योगांची उभारणी करीत बेरोजगार तरुणांचे प्रश्न सोडविण्यासह जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व महाविकास आघाडीचे उमेदवार बजरंग बप्पा सोनवणे यांच्याशिवाय दुसरा सक्षम पर्याय नसून मतदार बांधव, भगिनींनी बजरंग बप्पांना मतदानरुपी आशीर्वाद देत मोठ्या मताधिक्यांनी विजयी करीत संसदेत पाठवावे. असे आवाहनकाँग्रेसच्या नेत्या खा. रजनीताई पाटील, माजी मंत्री बदामराव पंडित, माजी आमदार साहेबराव दरेकर, माजी आमदार उषा दराडे, माजी आमदार सय्यद सलीम, माजी आमदार राधाकृष्ण होके पाटील, माजी आमदार सुनील धांडे, माजी आमदार सुरेश नवले, माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी केले आहे.

# उद्धव ठाकरे, इंडी आघाडी मुस्लिम लीगचीच भाषा बोलताहेत-आ. राणे

मुंबई । प्रतिनिधी

उद्धव ठाकरे, इंडी आघाडी सध्या मुस्लिम लीगचीच भाषा बोलत असून उद्धव ठाकरे, इंडी आघाडीला मत म्हणजे जिहादच्या समर्थकांना मत देण्यासारखे आहे, अशी टीका भारतीय जनता पार्टीचे आ. नितेश राणे यांनी रविवारी केली.





भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत आ. राणे बोलत होते. उद्धव ठाकरे यांच्या मुलाखतीवरून ते वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांचे नकली पुत्र आहेत, ही पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेली टीका योग्यच आहे, असेही आ. नितेश राणे यांनी सांगितले. पुढे बोलताना आ.नितेश राणे म्हणाले की, लोकसभा निवडणुकीत उद्धव ठाकरे, इंडी आघाडीच्या अन्य नेत्यांकडून वापरली जात असलेली भाषा धोक्याची घंटा आहे. कर्नाटक पॅटर्न देशभर राबवण्याचा इंडी आघाडी, उद्धव ठाकरे यांचा डाव लपून राहिलेला नाही. उद्धव ठाकरे हे मतांच्या लालसेपोटी मुस्लिम लीगची भाषा बोलू लागले आहेत. इंडी आघाडी आणि मविआला मत म्हणजे लव्ह जिहाद, लँड जिहाद ला मत देण्यासारखे आहे. सामनामधील मुलाखतीवरून उद्धव ठाकरे, इंडी आघाडी आणि मविआ ला धारेवर धरले. तसेच शिवसेना उबाठाच्या सामना या मुखपत्रातून ''ही निवडणूक हिंदुस्तान विरुद्ध पाकिस्तान अशी आहे'' या उद्धव ठाकरे यांच्या वक्तव्यावरही आ. नितेश राणे यांनी ठाकरेंवर टीकेची झोड उठवली.

संजय राऊत यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर केलेल्या टीकेचा आ. राणे यांनी समाचार घेतला. संजय राऊत यांनी अशी भाषा वापरणे थांबवावे अन्यथा भाजपा कार्यकर्त्यांचा संयम सुटेल, असा इशाराही त्यांनी दिला.

# हरियाणा सरकार विश्वासदर्शक ठरावासाठी विशेष अधिवेशन बोलविणार

चंदिगड । वृत्तसेवा

हरियाणात तीन अपक्ष आमदारांनी मुख्यमंत्री नायबसिंह सैनी यांच्या भाजपा सरकारचा पिंठबा काढून घेतल्याने राजकीय अस्थिरता निर्माण झाली आहे. आता विश्वासदर्शक ठराव मंजूर करण्यासाठी राज्य सरकार विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलवू शकते अशी माहिती समोर आली आहे. हरियाणा विधानसभेत विश्वासदर्शक ठराव होणार आहे, असा दावा माजी मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांनी केला आहे.

जेजेपीने हा मुद्दा उपस्थित करायला नको होता, पण आता त्यांनी हा मुद्दा उपस्थित केल्याने ते अडचणीत आले आहेत. जेजेपीचे सहा आमदार आमच्या संपर्कात आहेत असे मनोहर लाल खट्टर म्हणाले. तसेच, काँग्रेसदेखील एकजूट नाही आणि ३० पैकी ४-५ आमदार फुटण्याची शक्यता आहे. राज्यपालांनी काँग्रेसच्या ३० आमदारांच्या सह्या मागवल्या आहेत असेही मनोहर लाल खट्टर म्हणाले.



अलीकडेच हरियाणाचे माजी उपमुख्यमंत्री आणि जननायक जनता पक्षाचे(जेजेपी) अध्यक्ष दुष्यंत चौटाला यांनी राज्यपाल बंडारू दत्तात्रेय यांना पत्र लिहून विश्वासदर्शक ठरावाची मागणी केली होती. त्यांनी विधानसभेचे विशेष अधिवेशन बोलावून विश्वासदर्शक ठरावाची मागणी केली आहे. राज्यात सरकार स्थापन करणा-या कोणत्याही पक्षाला पिंठबा देण्यास तयार असल्याचे या पत्रात लिहिले होते. तसेच, हरियाणामध्ये राष्ट्रपती राजवट लागू करावी, असेही म्हटले आहे.

सध्या भाजपाजवळ ४० आमदार?

गेल्या काही दिवसांपूर्वी हरियाणा काँग्रेसचे अध्यक्ष उदय भान यांनी दावा केला होता की, हरियाणातील तीन अपक्ष आमदार सोमवीर संगवान, रणधीर सिंग गोलन आणि धरमपाल गोंदर यांनी भाजपा सरकारचा पिंठबा काढून घेत काँग्रेसला पाठिंबा दिला आहे. सध्या ९० जागांच्या हरियाणा विधानसभेत ८८ आमदार आहेत, त्यापैकी भाजपाचे ४० आमदार आहेत. दरम्यान, काँग्रेसचे म्हणणे आहे की, भाजपा सरकारला आधी जेजेपी आमदार आणि अपक्ष आमदारांचा पाठिंबा होता, मात्र जेजेपीनेही पिंठबा काढून घेतला होता आणि आता तीन अपक्षांनीही पाठिंबा काढून घेतला आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske, Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकूरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊन मतदान करावे-अजय मोरे

**पुणे । प्रतिनिधी**

शिरूर लोकसभा मतदारसंघात सोमवारी (दि. १३) मतदान होत आहे. सर्व घटकांतील पात्र मतदारांनी आपली जबाबदारी, कर्तव्य समजून या लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊन उत्स्फूर्तपणे मतदान करावे; आपल्या परिसरातील सर्व मतदारांना मतदान करण्यास प्रोत्साहित करावे, असे आवाहन शिरूर लोकसभा मतदारसंघाचे निवडणूक निर्णय अधिकारी अजय मोरे यांनी केले आहे. शिरूर लोकसभा मतदारसंघात जुन्नर, आंबेगाव, खेड-आळंदी, शिरूर, भोसरी आणि हडपसर या विधानसभा मतदारसंघांचा समावेश आहे. या लोकसभा मतदारसंघांकरिता होणारी संपूर्ण निवडणूक प्रक्रिया पारदर्शकपणे पार पाडण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. मतदानाच्या दृष्टीने मतदारसंघांतील सर्व तयारी पूर्ण झाली आहे.लोकशाहीच्या उत्सवात सहभागी होऊन मतदान करावे : अजय मोरे



प्रशासनाच्या वतीने मतदान केंद्रावर पिण्याचे पाणी, दिव्यांगांसाठी रॅम्प, सुरक्षा व्यवस्था, उन्हाळ्याची स्थिती लक्षात घेता औषधे, पाचपेक्षा अधिक मतदान केंद्रे असलेल्या मतदान केंद्रांवर बैठक व्यवस्था, उन्हाळा लक्षात घेता मंडपउभारणी आदी सुविधेसोबतच इतर तांत्रिक बाबींची पूर्तताही करण्यात आली आहे, अशी माहिती मोरे यांनी दिली. शिरूर मतदारसंघातील २ हजार ५०९ मतदान केंद्रांवर एकूण ११ हजार ५८६ मतदान अधिकारी, कर्मचारी नियुक्त करण्यात आले आहेत. सहायक निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालय स्तरावर मतदान प्रक्रियेसाठी नियुक्त करण्यात आलेल्या कर्मचार्यांना आवश्यक प्रशिक्षणदेखील वेळोवेळी दिले जात आहे.

शिरूर लोकसभा कार्यक्षेत्रात २५ लाख ३९ हजार ७०२ मतदार असून, यामध्ये १३ लाख ३६ हजार ८२० पुरुष मतदार, १२ लाख २ हजार ६७९ महिला मतदार आणि २०३ तृतीयपंथी मतदार आहेत. जुन्नर विधानसभा मतदारसंघात ३ लाख १२ हजार २०५ मतदार असून, त्यामध्ये १ लाख ५९ हजार ८३० पुरुष, १ लाख ५२ हजार ३७१ महिला, तर ४ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. आंबेगाव विधानसभा मतदारसंघात ३ लाख २ हजार १०१ मतदार असून, त्यामध्ये १ लाख ५४ हजार ५३५ पुरुष, १ लाख ४७ हजार ५५९ महिला, तर ७ तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे. खेड-आळंदी विधानसभा मतदारसंघात एकूण ३ लाख ५२ हजार ६३४ मतदार असून, त्यामध्ये १ लाख ८३ हजार ५७ पुरुष, १ लाख ६९ हजार ५६७ महिला, तर १० तृतीयपंथी मतदारांचा समावेश आहे.

# बुरशी आलेल्या गोळ्या पुरविल्या; ग्राहकाला मिळणार एक लाखांची नुकसान भरपाई

**पुणे । प्रतिनिधी**

ऑनलाईन ऑर्डर दिल्यानंतर ग्राहकाला रंग गेलेल्या आणि बुरशी आलेल्या गोळ्या पुरविणाऱ्याला ऑनलाईन गोळ्यांची विक्री करणाऱ्या कंपनीला महागात पडले आहे. ग्राहकाला एक लाख रुपये नुकसान भरपाई आणि तक्रार खर्च म्हणून पाच हजार रुपये द्यावा, असा आदेश अतिरिक्त जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाने दिला आहे.

आयोगाचे अध्यक्ष जयंत देशमुख, सदस्या प्रणाली सावंत आणि शुभांगी दुनाखे यांनी हा निकाल दिला. याबाबत पंकज जगसिया यांनी मॅक्लिओड्स फार्मास्युटिकल्स लिमिटेड व कंपनीचे संचालक, दाढा एण्ड कंपनी, नेटमेड्स डॉट कॉम आणि प्लॅनेट फार्मा वेअरहाऊस प्रा.लि यांच्याविरोधात आयोगात तक्रार दाखल केली होती. तक्रारदार यांनी ु.पशींशवी.ले या संकेतस्थळावरून त्यांच्या कुटुंबीयांसाठी काही औषधे मागविली होती. ही औषधे तक्रारदारांना २२ सप्टेंबर २०१९ ला एका सीलबंद पाकिटातून मिळाली. मात्र औषधाच्या दहा गोळ्यांच्या पाकिटातील दोन गोळ्यांचा रंग गेला होता. तसेच त्यांना बुरशी आली होती. तक्रारदारांनी या अनुषंगाने अन्न व औषध प्रशासनाकडे तक्रार केली होती. तक्रारदार यांनी त्या गोळ्या आपल्या ७२ वर्षांच्या आईसाठी मागवल्या होत्या. सदोष औषधे पुरविली म्हणून सर्व जाबदारांच्याकडून नऊ लाख ५० रुपयांची नुकसान भरपाई व तक्रार अर्जाचा खर्च म्हणून पाच हजार रुपये मिळावे, अशी मागणी तक्रारदारांनी आयोगाकडे केली होती.

# लोकसभा निवडणूक मतदानानिमित्त प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या कामकाजात बदल

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यात चौथ्या टप्प्यात मावळ, पुणे आणि शिरूर लोकसभा मतदासंघाच्या मतदानाकरीता सोमवार १३ मे रोजी शासकीय सुट्टी जाहीर केल्याने प्रादेशिक परिवहन मुख्यालय, दिवे ब्रेक टेस्ट ट्रॅक, ड्रायव्हिंग प्रशिक्षण आणि संशोधन संस्था (आयडीटीआर) नाशिक फाटा आणि आळंदी रस्ता येथील कामकाजात बदल करण्यात आल्याचे प्रादेशिक परिवहन अधिकारी पुणे यांनी कळवले आहे.

या सर्व ठिकाणी वाहन अनुज्ञप्ती, योग्यता प्रमाणपत्र, नूतनीकरण, वाहन नोंदणी व इतर सर्व कामकाज आणि १३ मे रोजीची पूर्वनियोजित वेळ घेतलेल्या वाहनधारक आणि उमेदवारांची वाहन तपासणी, चाचणी किंवा संबंधित कामकाज १४ ते १७ मे या कालावधीत होईल. या बदलाची वाहनधारकांनी, उमेदवारांनी नोंद घेवून बदल केलेल्या तारखेला नियोजित ठिकाणी उपस्थित रहावे, असे आवाहनही प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्यावतीने करण्यात आले आहे.

# अतिदुर्गम हारपुड येथे भीषण पाणीटंचाई : 'जलजीवन'चे काम अर्धवट; ठेकेदार पसार

**पुणे । प्रतिनिधी**

रायगड व पुणे जिल्ह्यांच्या हद्दीवरील उंच डोंगरावर अतिदुर्गम हारपुड (ता. राजगड) येथील ब्राह्मणखिंड धनगर वस्तीसह परिसरातील वाड्यांत गेल्या तीन महिन्यांपासून भीषण पाणीटंचाई सुरू आहे. येथील लाखो रुपये खर्चाच्या जलजीवन पाणीपुरवठा योजनेचे काम अर्धवट सोडून ठेकेदार पसार झाला आहे. या ठेकेदाराने एका खासगी संस्थेने बांधून दिलेली विहीर फोडून त्या ठिकाणी नवीन विहिरीचे काम अर्धवट ठेवले आहे. त्यामुळे कडकडीत उन्हाळ्यात यंदा विहिरीचे पाणीही मिळत नाही. सध्या हंडाभर पाण्यासाठी महिला,



मुले रणरणत्या उन्हात पायपीट करत आहेत. दूर अंतरावरील कडे-कपारीत मिळेल तेथून पाणी वाहून आणण्यासाठी रहिवाशांना दररोज मृत्यूशी झुंज द्यावी लागत आहे. यंदा उन्हाची तीव्रता अधिक असल्याने डोंगर कड्यातील पाणवठे कोरडे ठणठणीत पडले आहेत. सह्याद्रीच्या उंच डोंगरावर अतिदुर्गम ब्राह्मणखिंडीत जाण्यासाठी बारमाही पक्का रस्ता नाही

# मतदानाच्या पार्श्वभूमीवर गुन्हे शाखा आणि स्थानिक पोलिसांकडून झाडाझडती

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे लोकसभा मतदारा संघासाठी १३ मे रोजी होत असलेल्या मतदानाच्या अनुषंगाने पुणे पोलिसांच्या सर्व पोलीस ठाणे आणि गुन्हे शाखेने शहरात 'स्पेशल ऑपरेशन' राबवित गुन्हेगारांची झाडाझडती घेण्यास सुरुवात केली आहे. गंभीर गुन्ह्यांमध्ये जामीन मिळवून बाहेर पडलेले सराईत, तसेच त्यांच्या साथीदारांची चौकशी सुरू करण्यात आली आहे. दररोज, मध्यरात्री पोलिसांकडून तपासणी मोहिम (कोम्बिंग ऑपरेशन) राबविण्यात येत असून, गुंडांविरुद्ध प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येत आहे. शहरात मागील काही दिवसात गोळीबाराच्या घटना घडल्या आहेत. त्या पार्श्वभूमीवर देखील पोलीस सतर्क झाले आहेत. या तपासणीमध्ये ९ हजार २५५ गुन्हेगारांची तपासणी करण्यात आली. त्यापैकी ३ हजार २४९ गुन्हेगार प्रत्यक्ष पोलिसांसमोर तपासण्यात आले.

पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्या आदेशानुसार 'कोम्बींग ऑपरेशन' सुरू करण्यात आले आहे. जातीय तेढ निर्माण करणाऱ्या व्यक्ती, समाजविघातक कृत्य करणाऱ्या संघटना, व्यक्ती, रेकॉर्डवरील गुन्हेगार, हिस्ट्रीशिटर, हॉटेल/लॉजेस/ढाबे, एसटी व बस स्थानके, रेल्वे स्थानकांवर तपासणी करण्यात येत आहे. तसेच, दहशतवादी कृत्यांच्या अनुषंगाने घातपाती कारवायांच्या प्रतिबंधांसाठी 'कोम्बींग ऑपरेशन' कारवाई दरम्यान अति महत्वाच्या व्यक्तिंच्या जाण्या येण्याच्या मार्गावरील तसेच मार्गाच्या जवळपासचे 'हायराईज इमारती, नवीन बांधकाम सुरू असलेल्या इमारती, निर्जन स्थळांची, बेवारस वाहनांची कसून तपासणी केली जात आहे. तसेच, नाकाबंदी लावून ठिकठिकाणी संशयित वाहन चालकांची तपासणी केली जात आहे. या तपासणीकरिता गुन्हे शाखा व पोलीस ठाणे स्तरावरील अधिकारी व अंमलदार यांची पथके स्थापन करण्यात आली होती. शहरातील वेगवेगळ्या भागात २५ एप्रिल २०२४ ते ३० एप्रिल २०२४ आणि ०८ मे २०२४ ते १० मे २०२४ दरम्यान 'कोम्बींग ऑपरेशन' व वाहनांची तपासणी करण्यात आली.

बेकायदा शस्त्र बाळगल्याच्या एकूण ७ केसेस करुन आरोपींच्या ताब्यातून २ तलवार, ४ कोयते व १ सुरा जप्त करण्यात आला आहे. महाराष्ट्र पोलीस कायदा १४२ प्रमाणे एकुण ११ आरोपींवर तडीपार आदेशाचे भंगाची कारवाई केलेली आहे. ६० जामीनपात्र व अजामीनपात्र व स्टँडींग वॉरंटची बजावणी करण्यात आली आहे. गुन्हे शाखा युनिट ५च्या पथकाने दोन आरोपींच्या ताब्यामधून ४० हजारांची मोटार सायकल जप्त करुन भोसरी पोलीस ठाण्यातील गुन्हा उघडकीस आणला. तसेच, बिबवेवाडी पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यातील विधीसंघिर्षित बालकास पडकून बिबवेवाडी पोलिसांच्या ताब्यात दिले. लोणीकंद पोलिसांनी एका महिलेला अटक करून तिच्या ताब्यातून १० हजार ५०० रुपयांचा १ किला ३०४ ग्रॅम गांजा जप्त केला. तर, अंमली पदार्थ विरोधी पथक क्रमांक एकच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी एका आरोपीला अटक करीत त्याच्याकडून ३० हजार १० रुपयांची दारु जप्त करण्यात आली आहे. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तर, गुन्हे शाखा युनिट ६ च्या पथकाने लोणी काळभोर पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका फरार आरोपीला ताब्यात घेऊन लोणी काळभोर पोलिसांच्या हवाली केली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार, पोलीस सह आयुक्त प्रविण पवार, अतिरिक्त पोलीस आयुक्त (गुन्हे) शैलेश बलकवडे, पुर्व प्रादेशिक विभाग, मनोज पाटील, अतिरिक्त पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, प्रविणकुमार पाटील, पोलीस उपायुक्त (गुन्हे) अमोल झेंडे, पोलीस उपायुक्त संदीप सिंग गिल्ल, स्मार्तना पाटील, संभाजी कदम, विजयकुमार मगर, आर. राजा, वाहतूक शाखेचे उपायुक्त रोहिदास पवार यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा व पोलीस ठाणे स्तरावर नियुक्तीस असलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केली मुंबई प्रोव्हिबीशन अॅक्ट प्रमाणे पोलीस स्टेशन व गुन्हे शाखेने एकुण ४४ केसेस करुन ४४ आरोपींकडून रोख व गावठी दारु असा १ लाख ४०, हजार ३६५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. अवैध धंद्यात सहभागी पानटप-या, चायनीज गाडी, अंडाभुर्जी विक्री गाडी किंवा एनडीपीसी विक्री करणारे यांच्यावर २४ केसेस केल्या आहेत.

पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील एकूण २२०१ हॉटेल, ढाबे व लॉजेस तपासण्यात आले.

# मोरगावला टँकरने पाणीपुरवठा; एस. एम. के. फाउंडेशन, रोहिणीताई युवा मंचचा पुढाकार



**मोरगाव । प्रतिनिधी**

बारामती तालुक्यात विविध ठिकाणी पिण्याच्या पाण्याची समस्या गंभीर असल्याने बारामती पंचायत समितीमार्फत तसेच सामाजिक संघटनांकडून गावोगावी नागरिकांना टँकरद्वारे पाणीपुरवठा केला जात आहे. मोरगाव परिसरात पाणी टंचाईमुळे नागरिकांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत आहे.

ही समस्या लक्षात घेऊन एस.एम. के. फाउंडेशन पुणे व रोहिणीताई युवा मंचच्या अध्यक्षा रोहिणी कदम यांनी २७ एप्रिलपासून टँकरव्दारे पाणीपुरवठा सुरु केला आहे. मोरगाव गावठाण, वॉर्ड नं. १ ते वार्ड नं. ५ या ठिकाणी पाणी वाटप करण्यात येत आहे. त्यामुळे नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे. एक मोठा टँकर व एक लहान टँकरद्वारे पाणी पुरवठा केला जात असल्याची माहिती मंचचे पदाधिकारी महेश जाधव यांनी दिली.

# सिंहगड रस्ता भागात घरफोडी करणाऱ्या गुन्हेगाराना अटक, १९ लाखाचा मुद्देमाल जप्त

**पुणे । प्रतिनिधी**

सिंहगड रस्त्यावरील आनंदनगर भागात झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्यातील सराईत गुन्हेगारांना पोलिसांनी अटक केली. सिंहगड रस्ता पोलिसांनी आरोपींच्या ताब्यातून १९ लाख ५० हजार रुपयांचे सोन्याचे दागिने आणि इतर मुद्देमाल जप्त केला आहे.




संकेत प्रकाश निवंगुणे (वय २३, रा. बानगुडे चाळ संघर्ष चौक, वारजे माळवाडी) आणि सूरज शिवाजी भरडे (वय २४, रा. शिवसाईनगर, सुतारदरा, कोथरूड) अशी अटक केलेल्या संशयितांची नावे आहेत.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, २८ एप्रिल रोजी आनंदनगरमधील संतोष हॉलजवळ मधुरा बंगला सफलानंद सोसायटीमध्ये घरफोडी झाली होती. याबाबत सिंहगड रस्ता पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला होता. या घरफोडीत चोरीस गेलेल्या मुद्देमालापैकी ३७ तोळे वजनाचे सोने, हिरे, पाचू आणि दुचाकी जप्त करण्यात आली आहे.

पोलिस आयुक्त अमितेश कुमार, सहआयुक्त प्रवीण पवार, अतिरिक्त आयुक्त प्रवीणकुमार पाटील, परिमंडळ तीनचे पोलिस उपायुक्त संभाजी कदम आणि सहाय्यक आयुक्त भीमराव टेळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक विजय कुंभार, पोलिस निरीक्षक (गुन्हे) राघवेंद्रसिंह क्षीरसागर, सहाय्यक निरीक्षक सचिन निकम, पोलिस उपनिरीक्षक संतोष भांडवलकर, पोलिस कर्मचारी आबा उतेकर, संजय शिंदे, उत्तम तारू, राजू वेगरे, विकास बांदल, देवा चव्हाण, राहुल ओलेकर, सागर शेडगे, अमोल पाटील आदींनी ही कारवाई केली.

# एफआरपी रक्कम मिळाल्याने साखर गोड; देय रकमेपेक्षा ५३० कोटी अधिक रक्कम प्राप्त

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्ह्यातील संपलेला ऊसगाळप हंगाम २०२३-२४ मध्ये सर्व १४ साखर कारखान्यांनी उसाची रास्त आणि किफायतशीर किमतीची (एफआरपी) शंभर टक्के रक्कम शेतकर्यांच्या बँक खात्यावर जमा केली आहे. शेतकर्यांना सुमारे ११६.४२ टक्क्यांइतकी एफआरपीची रक्कम कारखान्यांनी दिलेली असून, ती ३ हजार ७५५ कोटी रुपये आहे. देय एफआरपीपेक्षा सुमारे ५३० कोटी अधिक जमा करण्यात आल्याचे पुणे प्रादेशिक साखर सह संचालक कार्यालयातून सांगण्यात आले. चौदापैकी १३ कारखान्यांनी शंभर टक्क्यांहून अधिक रक्कम शेतकर्यांना दिली आहे. त्यामुळे संपलेल्या ऊसगाळप हंगामाची सांगता अधिक गोड झाली आहे. एफआरपीच्या ३० एप्रिलअखेरच्या अहवालानुसार ताजी आकडेवारी उपलब्ध झालेली आहे. कारखान्यांनी हंगामात तब्बल



एक कोटी ३२ लाख ९५ हजार ६२७ टन उसाचे गाळप पूर्ण केले. त्यानुसार एकूण देय एफआरपीची रक्कम ३ हजार २२५ कोटी ५४ लाख रुपये होती. तर प्रत्यक्षात कारखान्यांनी ३ हजार ७५५ कोटी ३४ लाख रुपये शेतकर्यांना दिलेले आहेत. बहुतांशी कारखान्यांनी देय एफआरपी रकमेपेक्षा अधिकची एफआरपीची रक्कम शेतकर्यांच्या बँक खात्यावर जमा केलेली आहे.

# दूध दरामध्ये मोठी घसरण ; शेतकऱ्यांना आर्थिक फटका

**पुणे । प्रतिनिधी**

गायी, म्हशीच्या दूध दरात घट झाल्याने दूध उत्पादक शेतकरी मोठ्या आर्थिक अडचणीत सापडले आहेत. यामुळे गोठा मालकांनी तर जनावरांना बाजाराचा रस्ता दाखवत दावणी रिकाम्या करण्याचा निर्णय घेतला आहे. बाजारात दुभत्या जनावरांच्या किंमतीही ३० ते ४० हजार रुपयांपर्यंत कमी झाल्या आहेत. दूध दर उतरल्याने शेतकर्यांना जनावरे सांभाळण्याराठी तारेवरची कसरत करावी लागत आहे. बारामती तालुक्यात मोठ्या प्रमाणात दूध व्यवसाय केला जातो. मात्र, चार्याअभावी आणि दुधाचे घसरलेले दर यामुळे बळीराजाला नुकसान सहन करत जनावरांचे पालन-पोषण करावे लागत आहे. ग्रामीण भागात शेतीला जोडधंदा पशुपालन व्यवसाय निवडला जातो.



त्यामुळे शेतकर्यांच्या दारासमोर हमखास दोन-चार जनावरांची दावण असते. तरुणवर्गही दूध व्यवसायाकडे आकर्षित झाल्यामुळे तालुक्यातील अनेक गावागावात जनावरांचे गोठे तयार झाले होते. मात्र, दुधाचे दर उतरल्याने उत्पादन आणि खर्चात प्रचंड तफावत निर्माण झाली. त्यामुळे दूध उत्पादकांनी जनावरांना बाजारचा रस्ता दाखवण्यास सुरुवात केली आहे. लोणंद, बारामती, काष्टी, राशीन येथील बाजारात जनावरांच्या किमती कमी झाल्याचे चित्र पाहावयास मिळत आहे.

यापूर्वी गायीच्या दुधाला गुणवत्तेनुसार २२ ते ३० - ३२ रुपये दर मिळत होता. सध्या २० ते २५ रुपये प्रतिलिटरला दर मिळत आहे. त्यामुळे गायीच्या दूध दरात आठ ते नऊ रुपयांची घसरण झाली आहे. म्हशीच्या दूध दराला यापूर्वी गुणवत्तेनुसार सरासरी ३५ ते ४५ रुपये दर मिळत होता. पण, म्हशीच्या दूध दरातही आठ ते दहा रुपयांनी घसरण झाली असून सध्या २५ ते ३५ रुपयापर्यंत दर मिळत आहे. दुधाचे दर घसरले असले तरीही जनावरांच्या खाद्याच्या दरामध्ये वाढ झाली आहे. गोळीपेंड १५२० रुपयांना मिळत आहे. कडब्याचे दरही तीन हजार रुपयांवर गेले आहेत. भुसाही महागला आहे.

# गांधर्व महाविद्यालय, पुणे आयोजित रंगला सांगीतिक समारोह

**पुणे । प्रतिनिधी**

सुप्रसिद्ध शास्त्रीय गायिका रेवा नातू यांनी सादर केलेले खयालनुमा, तराणा, रागमाला, चतरंग तसेच ज्येष्ठ संवादिनीवादक, अभ्यासक डॉ. अरविंद थत्ते यांनी सादर केलला पंजाबी ठेका आणि सुप्रसिद्ध ज्येष्ठ शास्त्रीय गायिका कल्पना झोकरकर यांनी सादर केलेल्या कौशिकरंजनी, टप्पा, ठुमरीनुमा अशा वैविध्यपूर्ण सादरीकरणातून रसिकांवर स्वरानंदसरींचा वर्षाव झाला.

भारतीय संगीत प्रसारक मंडळ संचलित गांधर्व महाविद्यालय, पुणेच्या ९२व्या वर्धापनदिनानिमित्त महाविद्यालयाच्या विष्णु विनायक स्वरमंदिरात 'टप्पा, तराणा, त्रिवट, चतरंग, ठुमरी, दादरा' या गायन-वादनाच्या विशेष समारोहाचे आयोजन करण्यात आले आहे. समारोहाच्या दुसऱ्या दिवसाच्या सत्राचे उद्घाटन बडवे इंडस्ट्रीजच्या संचालिका सुप्रिया बडवे यांच्या हस्ते झाले. महाविद्यालयाचे प्राचार्य पंडित प्रमोद मराठे, उपप्राचार्य परिणिता मराठे, उपाध्यक्ष रवींद्र आपटे उपस्थित होते.

सुप्रिया बडवे म्हणाल्या, महाविद्यालयाचा ९२ वर्षांचा प्रवास स्पृहणीय आहे. हा एक सांगीतिक यज्ञ आहे. संगीत शिक्षण देणाऱ्या संस्थेची स्थापना करणे महत्त्वाचे आहे; परंतु हे कार्य सातत्याने सुरू ठेवणे अभिनंदनीय आहे. विद्यालयात विद्यार्थ्यांवर संगीताचे संस्कार होत असल्यामुळे येथून घडलेले कलाकार जागतिक स्तरावर रसिकमान्य ठरत आहेत.

दुसऱ्या दिवशीच्या समारोहाची सुरुवात रेवा नातू यांनी राग हमीरमधील खयालनुमाने केली. त्यानंतर पंडित बळवंतराय भट्ट रचित आडाचौतालातील 'ये दानी दारा' हा तराणा सादर करून रसिकांना मंत्रमुग्ध केले. 'दुर्गा माता दयानी देवी' या तीन तालातील रागमालेच्या सादरीकरणाला रसिकांनी भरभरून दाद दिली. मैफलीची सांगता राग अडाणा-तीनतालातील चतरंगमध्ये 'होरी होरी खेलत नंदलाल' या रचनेने केली. प्रशांत पांडव (तबला), लीलाधर चक्रदेव (संवादिनी), वैष्णवी सोनार (तानपुरा) यांनी




साथसंगत केली.

त्यानंतर डॉ. अरविंद थत्ते यांनी कार्यक्रमाची संकल्पना विशद करून पंजाबी शैलीतील तीन टप्पे अतिशय प्रभावीपणे सादर करत रसिकांना मोहित केले. आपल्यावर टप्पा वादनाचे संस्कार पंडिता मालिनी राजुरकर व पंडित शरद साठे यांनी केले असा आदराने उल्लेख करून डॉ. थत्ते यांनी मारुबिहाग रागातील स्वरचित टप्पा सादर केला. त्यानंतर काफी रागातील पारंपरिक टप्पा सादर करताना मिश्र काफीच्या माध्यमातून बागेश्री रागाचा अंशही वादनातून दर्शविला. किरवाणीतील टप्पा द्रुत लयीसह जोड या सादरीकरणाने त्यांनी वादनाची सांगता केली. भरत कामत (तबला) यांनी समर्पक साथ केली.

कल्पना झोकरकर यांनी सादरीकरणाची सुरुवात कौशिकरंजनी या अप्रचलित रागातील 'ए रि माई पिया परसेद गमन' या बंदिशीने केली. त्यानंतर खमाजमधील टप्पा सादर करताना 'वारी जांदी मै' ही बंदिश सादर केली. 'अपने पिया को जाने ना दुंगी, आज मै लडुंगी गुंह्या' या भैरवीनंतर 'मय ना लडी थी सैंया निकस गये' हे ठुमरीनुमा भजन सादर करून सादरीकरणाची सांगता केली. खुला आवाज, दमदार ताना, सुरेल स्पष्ट उच्चार या गायन वैशिष्ट्यांमुळे रसिकांच्या मनाचा ठाव घेतला. भरत कामत (तबला), सुयोग कुंडलकर (संवादिनी), मानसी पोतदार, चेतना खळे-तौकर (तानपुरा) यांनी समर्पक साथ केली.

कलाकारांचा सत्कार सुप्रिया बडवे, प्राचार्य पंडित प्रमोद मराठे यांनी केला. सुप्रिया बडवे यांचा सत्कार उपप्राचार्य परिणिता मराठे यांनी केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आनंद देशमुख यांनी केले. गांधर्व महाविद्यालय, पुणेच्या वर्धापन दिनानिमित्त शुभेच्छा देत ज्येष्ठ तबलावादक पंडित विनायक फाटक यांनी पंडित प्रमोद मराठे यांचा सन्मान केला.

फोटो ओळ : गांधर्व महविद्यालय, पुणे आयोजित समारोहात सहभागी कलाकार (डावीकडून) प्रशांत पांडव, रेवा नातू, वैष्णवी सोनार, लिलाधर चक्रदेव.

# 'बहुरंग' आयोजित आदिवासी लघु-चित्रपट महोत्सवाचे १५ व १६ मे रोजी आयोजन

**पुणे । प्रतिनिधी**

बहुरंग आयोजित सतरावा आंतरराष्ट्रीय आदिवासी चित्रपट महोत्सव दि. १५ व दि. १६ मे रोजी आयोजित करण्यात आला असून मराठी, हिंदी, तामिळ आणि इंग्रजी भाषेतील सहा लघुपट आणि एक चित्रपट पाहण्याची संधी पुणेकरांना मिळणार आहे.

आदिवासी जमातीची सामाजिक, सांस्कृतिक वैशिष्ट्ये, वेगळेपणा, त्यांची बोली भाषा, चालीरिती, जीवनशैली, धार्मिक कार्ये, देवदेवता, रुढी-परंपरा, कला, संगीत, नृत्य यातील वेगळेपणा सामान्य प्रेक्षकांना समजावा या उद्देशाने महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती बहुरंग, पुणेचे अध्यक्ष आणि आयोजक डॉ. कुंडलिक केदारी यांनी निवेदनाद्वारे कळविली आहे. महोत्सव पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक भवन, घोले रोड येथे आयोजित करण्यात आला असून महोत्सवाचे उद्घाटन दि. १५ रोजी सायंकाळी ५ वाजता मराठी चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराज राजेभोसले यांच्या हस्ते होणार आहे. प्रसिद्ध नाटककार श्रीनिवास भणगे यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. उद्घाटन समारंभानंतर 'जनार्दन महाराज वळवी', 'ज्यांचे कोणी ऐकत नाही' (मराठी), ट्राईब्स ऑफ निलगिरीज' (तामिळ), 'सिक्स इन्फ्लुएशिअल आदिवासी पोलिटिशिअन्स ऑफ द वर्ल्ड' (हिंदी), 'दुबळा' (मराठी), 'द गारोज' (इंग्रजी) हे लघुपट दाखविले जाणार आहेत.

दि. १६ रोजी सायंकाळी ५ वाजता समारोप समारंभ आयोजित करण्यात आला असून या प्रसंगी अखिल भारतीय मराठी चित्रपट निर्माता महामंडळाचे देवेंद्र मोरे, अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे. या वेळी 'आत्मबोध : द सेल्फ रिअलायझेशन' (हिंदी) हा चित्रपट दाखविला जाणार आहे. महोत्सव सर्वांसाठी खुला आहे.